मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive

'मोदी कालखंड' हा देशहिताचा ठरला नाही - खा. शरद पवार

वृत्त पान ४ वर...

RNI Regd. No. 72105/99 ⁂ वर्ष २५ ⁂ अंक २३० ⁂ सातारा ⁂ रविवार, दि. २८ एप्रिल २०२४ ⁂ पाने ६ (सुप्रभात) ⁂ किंमत ५/- रूपये

सांगलीत पक्ष विरोधात जाणाऱ्यांवर भाजप आक्रमक

निलंबानाची कारवाई; कारवाईच्या भीतीने अनेकजण गुपचूप विरोधात

सांगली / प्रतिनिधी

सांगली लोकसभा मतदार संघात भाजपचे विद्यमान खासदार संजयकाका पाटील उमेदवार आहेत, मात्र त्यांना विरोध करीत पक्षातूनच काही पदाधिकारी कार्यकर्ते काम करीत असल्याने अखेर जिल्हा भाजप आक्रमक झाले आहे. आशा कार्यकर्त्यांना पदावरून व पक्षातून निलंबित करण्याची कारवाई जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील व प्रकाश ढंग करीत आहेत.

जतचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी सर्वात प्रथम संजयकाका यांच्या विरोधात बंड पुकारून त्यांच्या उमेदवारीला विरोधस केला, काकांना उमेदवारी मिळताच त्यांनी पक्षाचा राजीनामा देत, विरोधी अपक्ष उमेदवार आणि वसंतदादांचे नातू विशाल पाटील यांना पाठींबा दिला. विलासराव जगताप यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी संजयकाका यांच्या कार्यकर्त्यांनी केली, मात्र तत्पुर्वीच जगताप यांनी स्वतःच पक्षाचा राजीनामा दिला.

त्यानंतर सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील महत्वाच्या असणाऱ्या मिरज शहरातील भाजपच्या पाच नगरसेवकांनी देखील विरोधाची भूमिका घेतली, त्यावर कारवाईचा इशारा देऊन एका नगरसेवकाचे मतपरिवर्तन करण्यात यश आले, इतर चार नगरसेवकांचा पक्ष विरोधी कारवाईचा अहवाल शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग यांनी प्रदेशाकडे पाठवला मात्र तत्पूर्वीच त्या चार नगरसेवकांनी स्वतःच राजीनामा दिला. भाजपच्या बंडखोर नगरसेवक

संदीप आवटे, निरंजन आवटी, आनंदा देव माने आणि शिवाजी दुर्वे यांचा समावेश आहे.

जतचे भाजप तालुकाध्यक्ष प्रमोद सावंत यांच्यावर देखील शुक्रवारी कारवाई करण्यात आली. लोकसभा निवडणूक २०२४ कार्यक्रम सर्वत्र सुरू आहे. सांगली लोकसभा मतदारसंघामध्ये भाजपा पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून श्री. संजय पाटील (काका) हे निवडणूक लढवत आहेत. पक्षाचा विचार व ध्येय धोरण घेवून भाजपा पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामाणिकपणे काम करत आहेत. मात्र आपण पक्षाचा विचार व ध्येय धोरणा यापासून दूर जाऊन पक्ष विरोधी काम करत आहात. यामुळे आपण पक्षामध्ये राहून पक्ष विरोधी काम करत असल्याने आपल्याला अध्यक्ष, जत भाजपा मंडल यापदावरून आतापासून निलंबन करण्यात येत आहे. असे पत्र जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील यांनी जारी केलं आहे.

दरम्यान, आता भाजप विरोधात उघड उघड काम करणाऱ्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर कारवाई होऊ लागल्याने, भाजपचे काही नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते गुपचूप विरोधात काम करीत असल्याची जोरदार चर्चा भाजप प्रचार कार्यालयात दबक्या आवाजात सुरू आहे.

शिंदेंना अटक झाल्यास सहन होणार नाही

अवघा महाराष्ट्र पेटून उठेल; शरद पवारांचा इशारा

दहिवडी / प्रतिनिधी

सातारा लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांना अटक करण्याचा प्रयत्न झाला तर आम्ही सहन करणार नाही. साताराच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्रातील जनता या अन्यायाविरोधात पेटून उठेल, असा निर्वाणीचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी राज्य सरकारला दिला.

शरद पवार यांची शनिवारी साताऱ्यातील दहिवडी येथे प्रचारसभा झाली. यावेळी त्यांनी सातारा लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या संभाव्य अटकेवरून महायुती

सरकारला इशारा दिला. शरद पवार म्हणाले की, भाजप मुंबई मार्केट समितीतील तक्रारीच्या आधारावर शशिकांत शिंदे यांना त्रास देण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्यावर गुन्हा नोंदवून काहीही करून त्यांना निवडणुकीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांच्यावर खटलाही दाखल करण्यात आला आहे. पण आता त्यांना अटक करण्याचा प्रयत्न झाला तर आम्ही हा अन्याय सहन करणार नाही. असे काही घडले तर सातारा जिल्ह्यातीलच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्रातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते याविरोधात आवाज उठवून संघर्ष करतील, असे शरद पवार यांनी ठणकावून सांगितले.

शशिकांत शिंदे व त्यांचे काही सहकारी मुंबई मार्केट समितीत चांगले काम करत आहेत. तिथे काही तक्रारी झाल्या आहेत. त्यानंतर त्या मार्केट समितीत अतिशय उत्तम काम करणाऱ्या पानसरे नामक संचालकाला अटक करण्यात आली आहे, असेही शरद पवार यांनी यावेळी सांगितले.

उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यावर आणखी एका प्रकरणात गुन्हा दाखल

सातारा : सातारा लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. शौचालय घोटाळा प्रकरणात त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला असतानाच आता पुन्हा 'एफएसआय' प्रकरणात त्यांच्यावर दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे आता शशिकांत शिंदे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. असे झाल्यास सातारा लोकसभा मतदारसंघातील ही मोठी राजकीय घडामोड म्हणावी लागेल.

या प्रकरणी एपीएमसी पोलिस ठाण्यामध्ये २४ संचालक आणि सचिव अशा एकूण २५ लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या गुन्हा नुसार येथील मसाला मार्केट मधील ४६६ गाळेधारकांना जास्तीचा एफएसआय देताना एपीएमसी प्रशासनाचे ६५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळेच हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये या गाळेधारकांना सहाशे रुपये चौरस फुटाणे परवानगी देण्यात आली होती. वास्तविक त्यावेळी रेडीरेकनरचा दर हा ३०६६ रुपये होता. मात्र, असे असताना केवळ सहाशे रुपये आकारले गेल्याने या प्रकरणात शासनाचे ६२ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. असा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांना एपीएमसी फळ मार्केटमध्ये शौचालय टेंडरच्या घोटाळ्याप्रकरणी न्यायालयाच्या वतीने अंतरिम जामीन मिळाला आहे. त्यामुळे त्यांना निवडणुकीच्या कार्यकाळामध्ये दिलासा मिळाल्याचे बोलले जात होते. मात्र, या प्रकरणात दिलासा मिळाल्यानंतर आता दुसरे प्रकरण समोर उभे राहिले आहे. आता या प्रकरणात शशिकांत शिंदे यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे.

थोडक्यात

पुण्याचे माजी महापौर मोहनसिंग राजपाल यांचे निधन

पुणे : पुणे महापालिकेचे माजी महापौर मोहनसिंग राजपाल यांचे आज अल्पशा आजाराने दुपारी ४ वाजता निधन झाले. जहांगीर हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. दिनांक २८ एप्रिल रोजी दुपारी १२ ते ४ रास्ता पेठ २३९ राहत्या घरी पार्थिव दर्शनाची वेळ ठेवलेली आहे. दुपारी चार नंतर पाच वाजता वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यविधी होणार आहेत, अशी माहिती भोला सिंग अरोरा यांनी दिली.

बेकायदा दारू विक्री प्रकरणी एकावर कारवाई

सातारा : बेकायदा दारु विक्री प्रकरणी एकावर सातारा तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बेकायदा दारु विक्री प्रकरणी उमेश नारायण पवार (वय ३५, रा. धावडशी ता.सातारा) याच्याविरुध्द सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून ८४० रुपये किंमतीच्या १२ बाटल्या जप्त केल्या. माळ्याचीवाडी येथे पोलिसांनी २५ एप्रिलला कारवाई केली.

संशयास्पद वस्तू जवळ बाळगल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : संशयास्पद वस्तू जवळ बाळगल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पोलीस गस्त घालत असताना दुचाकीस्वाराला दुचाकीच्या मालकीबाबत विचारणा केली असता त्याबाबत योग्य ती माहिती दिली नाही. यावरुन पोलिसांनी रमजान पापामिया सय्यद (वय ५५, रा. वाढे ता.सातारा) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई २५ एप्रिल रोजी करण्यात आली आहे.

जातीऐवजी 'धर्माधारित आरक्षण' लागू करण्याचा काँग्रेसचा डाव

घटनाबदल आणि आरक्षण विरोधाच्या टीकेवर पंतप्रधानांचा पलटवार

कोल्हापूर / प्रतिनिधी

मुस्लिमांचे लांगूलचालन करण्यासाठी जाती आधारित आरक्षणाऐवजी धर्माधिकारी आरक्षण लागू करण्याचा काँग्रेस आणि त्यांच्या मित्र पक्षांचा डाव असल्याचा आरोप करून भारतीय जनता पक्षावर केल्या जाणाऱ्या घटना बदल आणि आरक्षण विरोधाच्या टीकेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पलटवार केला.

कोल्हापूर आणि हातकणंगले या लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत पंतप्रधान मोदी बोलत होते. या सभेला मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीतील घटक पक्षांचे नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी देखील या सभेला उपस्थिती लावली.

आता होत असलेली निवडणूक ही विकसित भारतासाठी होणारी निवडणूक आहे. मात्र, विकासाच्या मुद्द्यावर आपण राष्ट्रीय लोकशाही आघाडीशी टक्कर घेऊ शकत नाही हे लक्षात आल्यानंतर काँग्रेस आणि इंडिया आघाडीने आपली रणनीती बदलली आहे. दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय यांना आरक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवून मुस्लिमांना आरक्षणाचा लाभ देण्याचे धोरण त्यांनी अंगीकारले आहे, असा आरोप मोदी यांनी यावेळी केला.

काँग्रेसने हा प्रयोग कर्नाटक मध्ये प्रत्यक्षात आणला आहे. मुस्लिम समाजाला खुश करण्यासाठी रातोरात एका कागदावर शिक्काऊ उमटवून संपूर्ण मुस्लिम समाजाचा समावेश इतर मागासवर्गीयांमध्ये करण्यात आला. त्यामुळे इतर मागासवर्गीयांपैकी मोठा वर्ग आरक्षणापासून वंचित राहिला आहे. याचीच पुनरावृत्ती देशभर करण्याचा काँग्रेसचा डाव आहे, असेही मोदी म्हणाले.

काँग्रेसची धोरणे देशविघातक असल्याची टीका करून मोदी म्हणाले की, काँग्रेसने सत्तेवर आल्यास काश्मीर मध्ये कलम ३७० पुन्हा लागू करून काश्मिरी जनतेला भारतापासून तोडण्याचा डाव आखला आहे. नागरिकत्व सुधारणा कायदा रद्द करण्याचाही त्यांचा मानस आहे. मात्र या देशातील जनता (पान २ वर)

भाजपची उत्तर मध्य मुंबईतून ॲड. उज्ज्वल निकम यांना उमेदवारी

■ **पूनम महाजन यांना उमेदवारी नाकारली**

मुंबई : भाजपने उत्तर मध्य मुंबईतून विद्यमान खासदार पूनम महाजन यांचा पत्ता कट करत ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ घातली आहे. आता लोकसभा निवडणुकीत त्यांचा सामना महाविकास आघाडीच्या काँग्रेस उमेदवार वर्षा गायकवाड यांच्याशी होईल. निकम यांच्या उमेदवारीने या मतदारसंघात अतितटीची लढाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भाजपने गत अनेक दिवसांपासून उत्तर मध्य मुंबईची लोकसभेची उमेदवारी राखून ठेवली होती. या मतदारसंघातून कुणाला उमेदवारी देणार, अशी चर्चाही सुरू होती. भाजपने शनिवारी जारी केलेल्या आपल्या १५ व्या यादीत या मतदार संघाची उमेदवारी ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांना देण्याची घोषणा केली.

उज्ज्वल निकम हे देशातील सर्वात प्रसिद्ध सरकारी वकिलांपैकी एक आहेत. त्यांनी मुंबईवर २६/११ चा अतिरेकी हल्ला करणाऱ्या अजमल कसाबसह, १९९३ चे साखळी बॉम्बस्फोट, गुलशन कुमार हत्याकांडा व प्रमोद महाजन हत्याकांडासारखे अनेक हायप्रोफाईल खटल्यांत सरकारतर्फे यशस्वी युक्तिवाद केला आहे. त्यांनी भाजपने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

माजी मंत्री वर्षा गायकवाड यांना खासदार बनवून दिल्लीला पाठवणार - उद्धव ठाकरे

मुंबई / प्रतिनिधी

देशात हुकूमशाही येता कामा नये, घटना बदलण्याचे काम सुरू असून त्याचे रक्षण करण्यासाठी ही लढाई आहे. महाविकास आघाडीचे राज्यात व देशात इंडिया आघाडीचे सरकार आले पाहिजे. माजी मंत्री वर्षाताई गायकवाड या मुंबई विभागीय काँग्रेसच्या अध्यक्ष आहेत त्या कुठूनही लढू शकतात, वर्षा गायकवाड यांना माझे मत मिळणार आहे, पंजाच्या हातात मशाल आहे व त्यानंतर तुतारी वाजवणार असे म्हणत वर्षाताई गायकवाड

यांना खासदार बनवून दिल्लीला पाठवणार, असा विश्वास माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

काँग्रेसच्या मुंबई विभागीय अध्यक्ष वर्षाताई गायकवाड यांना उत्तर मध्य मुंबईतून काँग्रेसची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी मातोश्री निवासस्थानी जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते.

यावेळी वर्षाताई गायकवाड म्हणाल्या की, मातोश्री व ठाकरे यांच्याशी पूर्वीपासूनचे चांगले संबंध आहेत, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये काम केले असून त्यांचा आशिर्वाद घेण्यासाठी ही भेट घेतली. मुंबईतील महाविकास आघाडीच्या सहाही जागांवर विजय मिळवू, असा विश्वास असून २००४ च्या लोकसभा निकालाची पुनरावृत्ती होईल, असे वर्षाताई गायकवाड यांनी सांगितले.

६७ दशलक्ष मुले जीवनरक्षक लसींपासून वंचित

मुंबई / प्रतिनिधी

कोविड महामारी दरम्यान पाळण्यात आलेल्या लॉकडाऊन कालावधीत नियमित लसीकरणामध्ये घट झाली असून जवळपास ६७ दशलक्ष मुले जीवनरक्षक लसींपासून वंचित आहेत. असे युनिसेफने सादर केलेल्या ''द स्टेट ऑफ द वर्ल्डस चिल्ड्रन '' या अहवालात दिसून आले आहे. अशी माहिती मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत जागतिक लसीकरण तज्ञ व व्होकार्ट हॉस्पिटल लॅसिकरण जनजागृती मोहिमेचे प्रमुख डॉ.जीनेंद्र जैन यांनी दिली.

देशात गोवरच्या प्रकरणांमध्येही चिंताजनक वाढ होत आहे. २०२२ मध्ये, अंदाजे ११ लाख मुलांनी भारतातील गोवर लसीचा पहिला डोस चुकवला, ज्यामुळे गोवर लसीकरणात सर्वात जास्त अंतर असलेल्या दहा राष्ट्रांमध्ये भारताची समावेश झाला आहे

असे जागतिक आरोग्य संघटना आणि यूएस केंद्रांचा अहवाल रोग नियंत्रण आणि प्रतिबंध (ढ्ड) अहवालात आढळून आले असे लहान मुलांचे तज्ञ व व्होकार्ट हॉस्पिटल लॅसिकरण जनजागृती मोहिमेचे सहयोगी डॉ. अंकित गुप्ता यांनी सांगितले.

२०२२ मध्ये ४०,९६७ प्रकरणांची नोंद झाली असून ३७ देशांपैकी भारत हा एक असल्याचे या अहवालात नमूद केले आहे. रोगप्रतिकारशक्ती विषयी बोलताना डॉक्टरांनी स्पष्ट सांगितले आहे की , लसीकरण हा बालकांच्या संगोपनातील महत्त्वाचा घटक आहे. पोलिओ, क्षयरोग, गोवर, कांजिण्या अशा विविध आजारांपासून लहान मुलांचे संरक्षण व्हावे आणि रोगप्रतिकारक क्षमता वाढावी, यादृष्टीने लसीकरण अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारतात २६ रोगांसाठी लस आहेत परंतु सामान्यतः फक्त १०-१२ रोगांवर लसीकरण केले जाते.

पौगंडावस्था, गर्भवती महिला आणि ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या वयोवृद्धांसह सर्वच वयोगटातील लोकांसाठी लसीकरण महत्त्वपूर्ण आहे आणि इन्फ्लूएंझा, न्यूमोनिया आणि हिपॅटायटीस यांसारख्या विविध संक्रमणांपासून संरक्षण करण्यात मदत (पान २ वर)

'यूएसके ॲग्रो'चे संचालक, उद्योजक संभाजी चव्हाण यांचे अपघातात निधन

चारचाकी गाडीचा भीषण अपघात : कुंभारवाडी जवळील घटना

तासगाव / प्रतिनिधी

तासगाव तालुक्यातील सिद्धेवाडीचे सुपुत्र तथा युएसके ॲग्रोचे संचालक, प्रसिद्ध उद्योजक संभाजी चव्हाण यांचे आज दुपारी भीषण अपघातात निधन झाले. जत वरून सिद्धेवाडी या आपल्या मूळ गावी यात्रेसाठी येत असताना कुंभारवाडी जवळ त्यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

याबाबत माहिती अशी, संभाजी चव्हाण हे आज सकाळी कामानिमित्त जत भागात गेले

होते. तेथील काम उरकल्यानंतर ते आपल्या सिद्धेवाडी या गावाकडे येत होते. सिद्धेवाडी येथील आज यात्रा असल्याने ते यात्रेसाठी गावाकडे येणार होते. आपल्या स्विफ्ट या गाडीतून ते गावाकडे येत होते.

कुंभारवाडी जवळ आल्यानंतर त्यांच्या गाडीचा ताबा सुटल्याने समोरून येणाऱ्या (पान २ वर)

घसरणारा मतांचा टक्का, सावरणार कोण? मनसेचे अस्तित्वच 'पणा'ला !

प्रवीण पगारे

पक्षाच्या स्थापनेनंतर मराठी अस्मितेचा मुद्दा, मराठी भाषेला दैनंदिन व्यवहारात प्राधान्य असो अथवा स्थानिकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य आदी मुद्दे घेऊन आक्रमकतेने आंदोलन करणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महाराष्ट्राची ब्लु प्रिंटही सादर केली ;पण प्रत्येक निवडणूकनिहाय मनसेची पर्यायाने पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांची भूमिका ही सतत बदलत गेली. त्यात मराठी भाषिकांच्या हक्कासाठी उत्तर भारतीयांविरोधात आक्रमकता दाखवणारे राज ठाकरे नंतर उत्तर भारतीय मंचाच्या व्यासपीठावर उभ्या महाराष्ट्राने पाहिले. त्यात आता हिंदुत्वाच्या मुद्द्यापर्यंत पोहोचणारे राज ठाकरे भाजपच्या मदतीने धार्मिक राजकारणाची खेळी खेळू पाहत आहेत. त्यामुळे पक्ष स्थापन होऊन १८ वर्षे होत आली, मनसेला यश का मिळत नाही हाच मुद्दा आता महत्वाचा ठरला आहे.त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात बिकट अवस्था झालेल्या मनसेची यंदाच्या लोकसभेच्या निमित्ताने खरी परीक्षा ठरणार आहे ती म्हणजे स्वतःची ताकद किती ? आणि स्वतःचे अस्तित्व टिकविण्याची !

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. त्यांच्या या भूमिकेने राजकीय वर्तुळात तसा काही फरक पडलेला नाही आणि पडणारही नाही असा ठाम दावा राजकीय विश्लेषकांचा आहे. एकतर आधीच वेळोवेळी भूमिका बदलणाऱ्या मनसेची वाताहत झाली आहे. एक प्रखर विरोधी पक्ष म्हणून प्रारंभी स्वतःची स्वतंत्र ओळख मिळवणाऱ्या मनसेने ती आता कायमची गमावली आहे. भाजपने मात्र 'प्रादेशिक पक्ष मुक्त राज्ये ' या धोरणातून मनसेला आधीच खिंडीत गाठले आहे. 'जगाला हेवा वाटेल असा महाराष्ट्र घडवू या' असे स्वप्न पाहणाऱ्या राज ठाकरे यांच्या मनसेची ताकद प्रारंभी जबरदस्त होती. १३ आमदार निवडून आले. साहजिकच राज्याच्या राजकारणात अन्य पक्षांना उपद्रव्यमूल्य दाखवून देणारा मनसे हा पक्ष टक्कर देणारा ठरला आणि तरुणाईला आकर्षित करणारा आणि लोकांना हक्काचा वाटणारा पक्ष ठरला. त्यातून जनाधारही वाढला. परिणामी राज्याच्या मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, संभाजीनगर अशा काही मोजक्या शहरात मनसेने हक्काची व्होट बँकही तयार केली. मात्र प्रत्येक निवडणुकीत मनसेची भूमिका बदलत गेली. इतर पक्षांच्या समीकरणांनुसार स्थान ठरवत गेले. कधी काँग्रेस - राष्ट्रवादीच्या बाजूने तर कधी विरोधात तर कधी मोदींना पसंती दिली तर कधी भाजपच्या विरोधात आणि आता ठाकरे गटाविरोधात शिंदे - पवार गटाला साथ त्यामुळे मनसेचा जनाधार कमी झाला आहे. तसे मनसैनिकही घटले आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच ज्यावेळी १३ आमदार निवडून आले,त्याच मनसेचे नंतर १- १ आमदार मात्र स्थानिक पातळीवर उमेदवाराच्या प्रभावानेच विजयी ठरले.याकडेही राजकीय अभ्यासक लक्ष वेधत आहेत.आता जशी शिवसेना आणि राष्ट्रवादीची अवस्था झाली आहे.मात्र या दोन्ही पक्षात मतांचे विभाजनापेक्षा सहानुभूतीचा फायदा मूळ पक्षांना होणार आहे. मात्र त्यातुलनेत मनसेची अवस्था बिकट आहे. सहानुभूती मिळणार तर नाहीच उलट मतदारांचा रोष मनसेला पत्करावा लागणार आहे. मुळात मनसेला गेल्या दहा वर्षात 'जय महाराष्ट्र' केलेल्यांची संख्या अधिक आहे. ती का तर सातत्याने भूमिका बदलण्यामुळेच मनसेला 'घरघर' लागली आहे. त्यात आता महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याच्या भूमिकेचेही तीव्र पडसाद उमटायला लागले आहेत. साहजिकच मनसेला पुन्हा गळती लागणार आहे. त्यामुळेच राज ठाकरे यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीला मनसैनिकांनी लागावे हे एकप्रकारे दाखवलेले 'गाजर' च आहे. हेही राजकीय विश्लेषकांनी अधोरेखित केले आहे.

दुसरे असे कि,भाजपला मनसेने दिलेल्या बिनशर्त पाठिंब्याने काय साध्य होणार ? या प्रश्नावर राजकीय अभ्यासक म्हणतात, मुळात यंदा मतांचे विभाजन मोठ्याप्रमाणावर होणार आहे. भाजपने जी व्यूहरचना आखली. त्यातच भाजप आता फसली आहे. परिणामी ४८ पैकी २० मतदारसंघ असे आहेत जिथे महायुतीचे उमेदवार चालणार नाहीत. तिथे महाविकास आघाडीला पोषक स्थिती असणार आहे. त्यामुळे जिथे जिथे मूळचे भाजपचे उमेदवार आहेत म्हणजे मुंबई, पुणे, नाशिक व अन्य मतदारसंघातील ते निवडून आणण्यासाठीच मतांचे समीकरण जुळविणे हा उद्देश असला तरी पूर्वीइतकी ताकद मनसेची राहिलेली नाही. त्यामुळे भाजपच्या पदरात मतांचे दान पडणे अवघड आहे. उदाहरण द्यायचे म्हटल्यास पुणे लोकसभा मतदारसंघाचे देता येईल. जिथे मनसेने ७५ ते ९४ हजार मते मिळवली होती ;पण ती कधी याचाही विचार केला पाहिजे.राज्याच्या पटलावर बदलत्या राजकीय घडामोडीत मनसेची भूमिकाही सातत्याने बदलत गेलेली आहे. त्यामुळे पुणे लोकसभा मतदारसंघात आधीच गटातटाच्या राजकारणात विखुरलेल्या मनसेची मते आजमितीस तितकी आहेत का ? हाच खरा प्रश्न असल्याचे राजकीय अभ्यासक नमूद करतात. अन्य राजकीय पक्षांच्या समीकरणानुसार मनसेने धोरणे बदलली त्याचा कितपत फायदा झाला हा मुद्दाही आता ऐरणीवर आला आहे.

गेल्या १८ वर्षांचा प्रवास पाहिला तर मनसेची अधोगतीच झाली आहे. कार्यकर्त्यांची गळती सुरूच आहे. मग अशा स्थितीत मनसेला आपलेसे करण्यामागे भाजपचा हेतू नक्की काय ? या प्रश्नावर राजकीय विश्लेषक मात्र राज्याच्या राजकीय पटलावरून मनसे आगामी काळात कुणामुळे 'वंचित' होईल हे येत्या विधानसभा निवडणुकांमध्ये कळेल. मात्र जिथे काँग्रेस मुक्त भारत हा अजेंडा भाजपचा होता. तिथे काँग्रेस काही संपणार नाही हेही भाजपला माहित आहे मात्र राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांची जी ताकद आहे. ज्यांचे स्वतःचे प्रबळ अस्तित्व आहे.अशा पक्षांना मोडीत काढून त्यांना भाजपमध्ये सामावून घ्यायचे आणि पुढील सत्ता समीकरणांचा एकहाती मार्ग तयार करायचा हेच धोरण भाजपचे आहे. त्यामुळेच त्याचा महाराष्ट्रातील पहिला बळी हा मनसेच ठरणार आहे. 'सांगता येत नाही आणि सहनही होत नाही ' या अवस्थेपर्यंत नेण्यात आजमितीस भाजपचा हात कुणीही धरणार नाही हे सत्य आहे. त्यामुळे हिंदुत्वाच्या मुद्द्यापर्यंत पोहोचणारे राज ठाकरे आता भाजपच्या मदतीने धार्मिक राजकारणाची खेळी खेळू पाहत असले तरी ती कितपत यशस्वी ठरते हे येणारा काळच सांगणार आहे. विकसित भारतासाठी मोदींना मत द्या म्हणणाऱ्या भाजपने पुढच्या लोकसभेला मनसेप्रमाणे भूमिका बदलली तर मनसेची अवस्था काय होईल या मुद्द्याकडेही राजकीय अभ्यासक लक्ष वेधत आहेत. त्यामुळे यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने मनसेची खरी परीक्षा असणार आहे.

■ मतांचा घसरता आलेख !

२००९साली स्वबळावर लढणाऱ्या मनसेने २०१४ला भाजपला पाठिंबा दिला आणि विधानसभा लढविण्याचा राज ठाकरे यांनी निर्णय घेतला मात्र माघार घेतली.मग २०१९ ला भाजप विरोधात ' लाव रे तो व्हिडीओ ' ही आक्रमक भूमिका घेतली आणि आता म्हणजे २०२४ च्या लोकसभेसाठी नरेंद्र मोदींसाठी बिनशर्त पाठिंबा ही भूमिका घेतली. विधानसभा निवडणुकीत मिळालेली मते पाहता मनसेच्या मतांची टक्केवारी ही घसरली. २००९ ला ५.७१ टक्के मते २०१४ ला ३. १५ टक्क्यांवर आले आणि २०१९ ला ते २.२५ टक्के यावर आले.

असाच आलेख लोकसभा निवडणुकांचा आहे.२००९ ला ४.१ टक्के मते मिळवणाऱ्या मनसेला २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत १.५ टक्के मते मिळाली.

पान १ वरून

संभाजी चव्हाण यांचे अपघातात निधन

गाडीला त्यांची धडक झाली. अपघातात स्विफ्ट या गाडीचा चक्काचूर झाला आहे. त्यातच चव्हाण यांनी गाडीचा सीट बेल्ट न लावल्याने गाडीच्या एअर बॅग बाहेर आल्या नाहीत. परिणामी गाडीने दोन - तीन पलट्या घेतल्या. या भीषण अपघातात चव्हाण यांचा जागीच मृत्यू झाला. चव्हाण हे प्रसिद्ध उद्योजक आहेत. आपले मित्र रमाकांत यांच्यासोबत त्यांनी यु एस के ऍग्रो या फर्मची स्थापना केली. अतिशय दर्जेदार शेती औषधे या कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली. अतिशय गरिबीच्या परिस्थितीतून चव्हाण यांनी खडतर परिश्रम घेत यशस्वी उद्योजक होण्याची किमया केली होती. त्यांच्या अपघाताची बातमी वाऱ्यासारखी जिल्ह्यात पसरली. गावाकडील अनेक लोक अपघातस्थळी दाखल झाले. कवठेमहांकाळ ग्रामीण रुग्णालयात त्यांचे शवविच्छेदन करण्यात आले.

६७ दशलक्ष मुले जीवनरक्षक लसींपासून वंचित

करते, असे बालरोग तज्ञ व व्होकार्ट हॉस्पिटल लॅसिकरण जनजागृती मोहिमेचे सहयोगी डॉ बादशाह खान यांनी सांगितले. डिप्थीरिया, टिटॅनस आणि डांग्या खोकला (पेयुसिस) विरुद्ध लढण्यासाठी ढ्रझ लस महत्त्वपूर्ण आहे, तर एमएमआर लस गोवर, गालगुंड आणि रुबेला विरुद्ध प्रभावी आहे. मेनिंजायटीस मेनिन्गोकोकल लसीने, व्हेरिसेला लसीमुळे कांजण्या, आयपीव्ही लसीने पोलिओ आणि न्यूमोकोकल लसीद्वारे न्यूमोनिया टाळता येतो. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग प्रतिबंधाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी सरकार एचपीव्ही लस देखील पुरवते असे डॉ. अंकित गुप्ता यांनी सांगितले.

जातीऐवजी 'धर्माधारित आरक्षण'...

काँग्रेसला हा उलटफेर धरू देणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. ज्या काँग्रेस आणि इंडिया आघाडीची तीन आकडी संख्येने खासदार निवडून आणण्याची मारामार आहे, ते सरकार स्थापनेच्या दारापर्यंत तरी पोचणार का, अशा शब्दात मोदी यांनी विरोधकांची खिल्ली उडवली. इंडिया आघाडीतील दक्षिण भारतातील घटक पक्ष पुन्हा भारताचे विभाजन करण्याची भाषा बोलत आहेत. दक्षिणेकडील राज्यांचा स्वतंत्र देश उभारण्याचे स्वप्न बघत आहेत. सनातन धर्मावर अशोभनीय टीका करीत आहेत. त्यांच्या या कृत्याबद्दल भारतीय जनता त्यांना माफ करणार नाही, असेही मोदी म्हणाले. अयोध्येत राम मंदिर उभारणीचे भारतीयांचे पाचशे वर्षांचे स्वप्न साकार झाले. या मंदिर उभारणीला अनेक दशके विरोध करूनही मंदिराच्या विश्वस्तांनी काँग्रेसला माफ केले. त्यांच्या नेत्यांना घरी जाऊन कार्यक्रमाची निमंत्रण दिली. मात्र काँग्रेसने रामलल्लाचे निमंत्रण नाकारून कार्यक्रमावरच बहिष्कार घातला. वास्तविक,, राम मंदिराच्या विरोधात ज्यांनी पिढ्यानपिढ्या न्यायालयीन संघर्ष केला त्या अन्सारी परिवारातील लोकही न्यायालयाच्या निर्णयाने राम मंदिराची उभारणी झाल्यावर या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिले. काँग्रेसने मात्र हे निमंत्रण नाकारले. नकली शिवसेना याच काँग्रेसच्या हातात हात घालून चालत असल्याचे पाहताना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना किती वेदना होत असतील, अशी टीकाही मोदी यांनी केली. भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने दहा वर्षात केलेल्या प्रगतीचा पटही मोदी यांनी या सभेत मांडला. आपल्या भाषणाचा समारोप करताना मोदी म्हणाले की, ही सभा संपवून परत गेल्यावर तुम्हाला जे भेटतील त्यांना माझा प्रणाम सांगा. अशा साऱ्या परिवारांचे शुभाशीर्वाद माझी ऊर्जा वाढवतील. ही ऊर्जा तुमच्याच कामाला येईल कारण तुमची स्वप्न हाच माझा संकल्प आहे.

पुण्याच्या आरोग्य सुविधांना मिळतोय मोठा 'बूस्टर'

■ बिबवेवाडीतील 'ईएसआयसी' रुग्णालय होणार लवकरच कार्यान्वित

■ पाचशे खाटांच्या रुग्णालयात मिळणार अत्याधुनिक आरोग्य सुविधा : मुरलीधर मोहोळ

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : बिबवेवाडी येथील ईएसआयसी अर्थात कामगार विमा रुग्णालयात १०० बेडचे सुसज्ज रुग्णालय कार्यान्वित झाले असून १६ एकर जागेतील सात मजली इमारतीत ५०० खाटांचे सर्व आधुनिक सोयींनी सुसज्ज विस्तारीत रुग्णालयाचे काम नजिकच्या काळात पूर्ण होईल. त्यामुळे पर्वती, बिबवेवाडी, सिंहगड रस्ता परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, असे मत भाजप महायुतीचे पुणे लोकसभा मतदारसंघातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले.

पर्वती विधानसभा मतदारसंघातील आंबेडकर नगर, आदिनाथ सोसायटी, प्रेमनगर, गंगाधाम, मार्केट यार्ड बस डेपो, महेश सोसायटी, चिंतामणीनगर, अप्पर इंदिरानगर आदी परिसरात मोहोळ यांच्या प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार माधुरी मिसाळ, आमदार सुनील कांबळे, समन्वयक श्रीनाथ भिमाले, दीपक मिसाळ, राजेंद्र शिळीमकर, मानसी देशपांडे, रुपाली धाडवे, वर्षा साठे, कविता वैरागे, राजश्री शिळीमकर, प्रविण चोरबोले, अनुसया चव्हाण, प्रशांत दिवेकर, शिवसेना नेते सुधीर कुरूमकर, नितीन लगस, श्रीकांत पुजारी, अविनाश खेडेकर, राष्ट्रवादीचे संतोष नांगरे, श्वेता होनराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

मोहोळ म्हणाले, 'ससूनच्या धर्तीवर रुग्णालय उभारू अशी घोषणा काँग्रेसकडून अनेक वर्षे केली गेली. पण ती कधीही प्रत्यक्षात आली नाही. आमदार माधुरी मिसाळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने केंद्र शासन हे रुग्णालय उभारत आहे. नव्या प्रशस्त रुग्णालयात अतिदक्षता विभाग, बाह्यरूग्ण कक्ष, सुपर स्पेशालिटी सुविधांसाठी स्वतंत्र कक्ष, साधारण व अतिदक्षता विभागाचे कक्ष असतील. रेडिओलॉजी, बायोकेमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी प्रयोगशाळांचा समावेश असेल. पुढील दोन वर्षांत बांधकाम पूर्ण होईल.

महापालिकेचे पहिले वैद्यकीय महाविद्यालय सुरू

पुणे महापालिकेचे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय माझ्या महापौर पदाच्या कारकिर्दीत सुरू करता आले याचा विशेष आनंद वाटतो. या महाविद्यालयामुळे वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण आणि रुग्णांना किफायतशीर दरात आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत. कोरोना काळात शहराच्या आरोग्य यंत्रणांचे आधुनिकीकरण आणि विस्तार करण्यात आला.

'कोटपा' कारवाईत ई- चलनानेच व्यसनमुक्ती

मुंबई/प्रतिनिधी

तंबाखूच्या सेवनाचा सार्वजनिक आरोग्यावर होणारा परिणाम, तंबाखू कंपन्याकडून तरुण वर्ग आणि शालेय विद्यार्थ्यांना ग्राहक म्हणून लक्ष्य करणे सुरु आहे. त्यामुळे सार्वजनिक धूम्रपान विरोधात '' कोटपा '' कारवाईची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. तसेच शासनाने कोटपा कारवाईत ई- चलन अंतर्भूत करावे, अशी आग्रही मागणी राज्यभरात तंबाखूच्या दुष्परिणामावर कार्यरत असलेल्या अशासकीय संस्थाच्या समन्वय बैठकीत शासनाकडे करण्यात आली.

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था औरंगाबाद, विटाल स्ट्रॅटेजिस्ट, टाटा मेमोरिअल सेंटर, राज्य राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने कोटपा कायद्याच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी राज्यभरातील अशासकीय संस्थांची समन्वय बैठक मंगळवारी टाटा मेमोरिअल सेंटर खारघर येथे संपन्न झाली. या बैठकीत आरोग्य सेवा सहायक संचालक डॉ. दिनेश सुतार, डॉ. प्रकाश गुप्ता, नगरपरिषद प्रशासन उपायुक्त सुवर्णा शिंदे, डॉ. राणा सिंग, डॉ. अर्जुन सिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शन भाषणात राज्यात सर्व शाळा तंबाखूमुक्त करण्यासाठी तसेच कोटपा २००३ कायद्याची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व अशासकीय संस्थानी सहकार्य करावे. कोटपाची कारवाई करताना चलनाचा प्रश्न निर्माण होतो. त्याबाबत शासन स्तरावर ई चलन कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे आरोग्य सेवा सहायक संचालक डॉ. दिनेश सुतार यांनी सांगितले.

या बैठकीत राज्यभरातील तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणाच्या जनजागृतीसाठी कार्यरत संस्था सहभागी झाल्या होत्या. यावेळी तंबाखू कंपन्यांकडून सुरु असलेल्या छुप्या जाहिराती विरोधात जनहित याचिका दाखल करण्यावर सर्वांचे एकमत झाले. तसेच तंबाखूमुक्त शाळा, शैक्षणिक संस्था, परिसर करण्यासाठी कृती आरखडा तयार करण्यात आला.

शिरवळमधील दुकानांना भीषण आग

■ ५ ते ६ दुकाने जळून खाक; लाखो रुपयांचे नुकसान

शिरवळ : शिरवळ मधील जिल्हा परिषद शाळे समोरील दुकानांना आज सकाळी भीषण आग लागली. या आगीत ५ ते ६ दुकाने जळून खाक झाली असून, लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

आगीची माहिती मिळताच अग्निशामक दल आणि शिरवळ पोलिस घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ आग विझवण्याचे काम सुरू केले.दुकानांमध्ये काय काय साहित्य होते याची माहिती अद्याप मिळू शकलेली नाही. आगीचे कारण अस्पष्ट आहे. शिरवळ पोलिस आगीमागे काय कारण आहे याचा तपास करत आहेत. सुदैवाने या आगीत कोणालाही दुखापत झाली नाही.

शिरवळ शहरात आगीच्या घटना वाढत आहेत. या आगीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने या आगीच्या घटनांवर त्वरित नियंत्रण मिळवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी पंतप्रधान मोदी यांच्या 'महाविजय संकल्प' सभेचे आयोजन

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुणे, शिरूर, बारामती आणि मावळ लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी महाविजय संकल्प सभेचे आयोजन येत्या २९ एप्रिल रोजी वानवडी येथील रेस कोर्स मैदान येथे सायंकाळी ५ वाजून ३० मिनिटांनी करण्यात आले आहे. या सभेला महायुतीचे दोन लाख कार्यकर्ते उपस्थित राहतील, अशी माहिती प्रदेश भाजपचे उपाध्यक्ष राजेश पांडे यांनी दिली.

यावेळी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, शिवसनेचे शहर प्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे, शिवसेना सहसंपर्क प्रमुख संजय भोसले, मनसेचे अध्यक्ष साईनाथ बाबर, आरपीआयचे अध्यक्ष संजय सोनावणे, पुणे लोकसभा प्रभारी श्रीनाथ भिमाले, महायुती समन्वयक संदीप खर्डेकर, राजेंद्र शिळिमकर आदी उपस्थित होते.

पांडे म्हणाले, अनेक वर्षानंतर पुण्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होत असून रेसकोर्स याठिकाणी सभेचे आयोजन केले आहे. सभेच्या माध्यमातून महायुतीच्या चारही उमेदवारांची ही महाविजय संकल्प सभा असणार आहे. १२८ एकरांमध्ये ही सभा होणार असून या सभेला २ लाख नागरिक उपस्थित राहणार आहेत. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट, मनसे, आरपीआय यांच्याबरोबर सर्व सहकारी पक्ष सभेच्या तयारीला लागले आहेत. २१ विधानसभा मतदारसंघामधून सभेसाठी कार्यकर्ते येणार असल्याचे पांडे म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोर्हे मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांच्यासह ३ हजार व्हीआयपी यासभेला उपस्थित राहणार आहेत. सभेसाठी आठ ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यकर्त्यांना समाज माध्यमातून गुगल लिंक पाठवण्यात येणार आहे. त्यानुसार त्यांचे पार्किंग कोठे आहे ते त्यांना समजेल. कार्यकर्त्यांनी येताना पाण्याची बाटली आणू नये. पाण्याची सोय मैदानात करण्यात आली आहे. २२ ठिकाणी एलइडी लावण्यात येणार आहेत. पंतप्रधान मोदी येण्यापुर्वी सुरक्षेच्या दृष्टीने सर्व दरवाजे बंद करण्यात येतील. त्यामुळे नागरिक आणि कार्यकर्त्यांनी ४ वाजून ३० मिनिटापर्यंत सभेच्या ठिकाणी पोहचावे असे पांडे यांनी सांगितले.

कोडोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भौतिक सुविधांपासून वंचित

शाळेसाठी ६ एकर जागा देणाऱ्या स्व. मेजर पांडुरंग जाधव परतवंडाची जिल्हा परिषदेकडे तक्रार

सातारा : प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील तब्बल ८०० हून अधिक विद्यार्थी संख्या असलेल्या कोडोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भौतिक सुविधा पासून वंचित असून या शाळेमध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या शाळेच्या परिसरातच एका कर्मचाऱ्यांनी अतिक्रमण केले असून शाळेच्या छताची दुरावस्था झाली आहे. या शाळेसाठी विद्यार्थी व शिक्षकांसाठी भौतिक सुविधा जिल्हा परिषदेने देऊन या शाळेतील समस्या दूर कराव्यात अशी मागणी या शाळेसाठी सहा एकर जागा दान करणारे कै. मेजर पांडुरंगराव रामचंद्रराव जाधव यांचे पणतू, उद्योजक एस. व्ही. जाधव यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन देखील त्यांनी सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहे.

सदर शाळा एस. व्ही जाधव यांचे पणजोबा कै. मेजर पांडुरंगराव रामचंद्रराव जाधव यांनी स्वमालकीची ६ एकर जमीन दान देऊन स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन केली आहे. त्यामागे त्यांचा आपल्या गावातील मुले आणि मुली यांना एकत्र शिक्षणाची योग्य संधी गावातच उपलब्ध व्हावी हा उदात्त हेतू होता. ही शाळा कोल्हापूर विभागातील जिल्हा परिषदेची सर्वात जास्त विद्यार्थी पटसंख्या ८५९ असणारी शाळा आहे, त्यामध्ये ५०% मुली शिकत असून सदर शाळेची गुणवत्ता चांगल्या दर्जाची आहे व शाळेने शासकीय स्पर्धा परीक्ष्यांमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केलेली आहे. गत तीन वर्षामध्ये साधारणपणे ६० विदयार्थी ५ वी, ८ वी, शिष्यवृत्ती, एन.एन.एम.एस., सारथी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत आलेले आहेत. त्याचप्रमाणे इतर स्पर्धा परीक्षेत देखील सुद्धा सुमारे २०० विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. तसेच शासकीय व शालेय क्रीडा स्पर्धे मध्ये विदयार्थ्यांनी भाग घेऊन जिल्हास्तरावर उज्वल यश संपादन केले आहे. जि.प्र.प्राथ. शाळा कोडोली ही सुमारे १ हेक्टर ६०.८ आर क्षेत्रात आहे. शाळेस सुमारे १०,००० स्क्वेअर फूट क्रीडांगणासाठी जागा उपलब्ध आहे. या शाळेच्या आवारात एक ग्रामपंचायत कर्मचारी अतिक्रमण करून राहत आहे. या शाळेच्या इमारतीचे छत पावसाळ्यामध्ये गळत आहे. मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वछतागृहेबांधण्याची गरज आहे.

कै. मेजर पांडुरंगराव रामचंद्रराव जाधव

> "या शाळेच्या परिसरातील काही अतिक्रमणे ही स्वतः पुढे होऊन काढून टाकली आहेत. अजूनही काही अतिक्रमणे आहेत. यासाठी शासनाने या जागेची मोजणी करण्याची आवश्यकता आहे.
>
> – एस. व्ही. जाधव.

शाळेसमोर राज्य महामार्ग असल्याने शाळेत विद्यार्थ्यांना ये जा करण्यासाठी स्कायवॉक तसेच रस्त्यावर गतिरोधक आणि पुढे शाळा असलेले दिशादर्शक फलक लावण्यात यावेत,शाळा प्रवेशद्वारा शेजारी ड्रेनेज पाईप टाकून सर्वत्र बंदिस्त गाटारांची सोय करावी, शाळेसाठी अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा, संगणक कक्ष, ग्रंथालय व्हच्र्युअलसुविधा देण्यात यावी,क्लासरूम, स्वतंत्र किचन शेड, धान्यसाठा गृह, क्रीडा साहित्य खोली, सांस्कृतिक सभागृह इत्यादिसाठी ६ खोल्या बांधण्यात याव्यात, शालेय विद्यार्थी सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही बसविण्यात याव्यात, कंपाऊंड भिंतीची उंची वाढवणे व बंदिस्त करावी, शाळेसाठी बंदिस्त व्हरांडे,अद्ययावत संगणक कक्ष व संगणक प्रशिक्षक तसेच शालेय क्रीडांगण ४०० मीटर ट्रॅक व इतर मैदाने बनवून आवश्यक क्रीडा साहित्य मिळावे वरिष्ठ मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षक यांची रिक्त पदे भरावी, शाळेच्या या संपूर्ण ६ एकर जागेपैकी बऱ्याच जागेवर अतिक्रमण झाले आहे. तरी या आम्ही दान दिलेल्या जमिनीचे पुन्हा सरकारी भूमापन करण्यात यावे, अशा महत्वपूर्ण मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

निवडणूक निरीक्षकांकडून जिल्ह्यातील निवडणूक तयारीचा आढावा

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक, निवडणूक पोलीस निरीक्षक आणि खर्च निरीक्षक यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांसह शुक्रवारी सायंकाळी निवडणूक तयारीचा आढावा घेतला.

यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक बुदीती राजशेखर, निवडणूक पोलीस निरीक्षक विवेकानंद सिंग, निवडणूक खर्च निरीक्षक सुधांशू राय, पुणे लोकसभा मतदारसंघ निवडणूक निरीक्षक प्रसाद लोलयेकर, निवडणूक पोलीस निरीक्षक ज्योती नारायण, खर्च निरीक्षक कमलेश मकवाना, बारामती लोकसभा मतदारसंघ निवडणूक पोलीस निरीक्षक जॉएस लालरेम्मावी, खर्च निरीक्षक विजय कुमार, शिरुर लोकसभा मतदारसंघ निवडणूक निरीक्षक कुमार सौरभ राज, निवडणूक पोलीस निरीक्षक जया गौरी, खर्च निरीक्षक बी. मोहन, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे, मावळ मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला, बारामती मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी, शिरुरचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे आदी उपस्थित होते.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती करावी, मतदान केंद्रावर उपलब्ध करण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी. निवडणूक कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात. उमेदवारांचा निवडणूक खर्च योग्य पद्धतीने नोंदविला जाईल यावर लक्ष देण्यासह निवडणूक खर्चाची पडताळणी करावी. नियमाप्रमाणे वेळोवेळी निवडणूक खर्चाचे परीक्षण करावे. मतमोजणी केंद्रांच्या ठिकाणीदेखील सर्व सोयीसुविधा उपलब्ध करण्याच्यादृष्टीने वेळोवेळी आढावा घेऊन पूर्वतयारी करावी, आदी सूचना योवळी निवडणूक निरीक्षकांनी दिल्या.

निवडणुकीत रोकड, मद्य तसेच इतर कोणत्याही स्वरुपातील आमिषांचा वापर होऊ नये यासाठी तपासणी नाक्यांवर तसेच भरारी पथकांद्वारे जास्तीत जास्त वाहनांची तपासणी करावी. अवैध मद्य वाहतूक व विक्री प्रकरणात राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्तीसह कठोर कारवाई करावी, अशाही सूचना निवडणूक निरीक्षकांनी दिल्या.

जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी पुणे जिल्ह्यातील निवडणूक तयारीचा आढावा सादरीकरणाद्वारे देताना सांगितले, जिल्ह्यातील विशेषत: शहरी भागातील मतदाराची टक्केवारी वाढविण्यासाठी गेल्या तीन वर्षात युवा मतदार, उद्योगांमध्ये काम करणारे मतदार, महिला मतदार यांच्यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. जिल्ह्यात ८३ लाख ३८ हजार ७४७ इतकी मतदार संख्या असून मतदान जागृती उपक्रमांतर्गत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या १८ ते १९ वयोगटातील युवा मतदारांची संख्या १ लाख १ हजार ४४४ तर २० ते २९ वयोगटातील मतदारांची संख्या १३ लाख ८० हजार ४३१ असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात ८ हजार ३८२ मतदान केंद्रे असून १९ संवेदनशील मतदान केंद्रे आहेत. अतिसंवेदनशील मतदान केंद्र एकही नसून शॅडो भागातील ३८ मतदान केंद्रे आहेत. येथे संपर्कासाठी हॅम रेडिओसह अन्य व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मतदारसंघांसाठी मिळून १० हजार ३१ क्षेत्रीय (सेक्टर) अधिकारी तसेच ८५९ सेक्टर पोलीस अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. टपाल, ईमेल आदीद्वारे तसेच सी-व्हिजीलद्वारे आचारसंहिता मोठ्या ७८२ तक्रारी प्राप्त झाल्या असून कार्यवाही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

श्रीमती द्विवेदी यांनी सांगितले, बारामती लोकसभा मतदार संघात तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी मतदान होणार असून मतदारसंघासाठी आवश्यक अतिरिक्त बॅलेट युनिट प्राप्त झाले त्यांच्या पुरवणी सरमिसळसह दुसरी सरमिसळ झाली आहे. मतदान कर्मचाऱ्यांचे तीन प्रशिक्षण झाले असून मतदान केंद्रांवरील तयारी अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पिंपरी चिंचवडचे अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी कायदा व सुव्यवस्था तसेच निवडणुकीसाठी पोलीस बंदोबस्ताबाबत माहिती देतानाच परवानाप्राप्त शस्त्र जमा करण्याची कार्यवाही, मद्य, रोकड जप्तीची कारवाई आदी माहिती दिली.

बैठकीस सर्व विधानसभा मतदार संघांचे सहायक निवडणूक निरीक्षक, सर्व निवडणूकविषयक जबाबदाऱ्यांचे समन्वयक अधिकारी आदी उपस्थित होते.

सोमनाथ लोहार यांच्या कामाचे उपमुख्यमंत्री अजितदादांकडून कौतुक

पुणे / प्रतिनिधी

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेत माझे मार्गदर्शक डॉ. अभिषेकदादा बोके व महाराष्ट्राचे युवा नेते पार्थ पवार यांनी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष म्हणुन सोमनाथ लोहार यांना विशेष जबाबदारी दिली असून बारामती व शिरुर लोकसभेतील निवडणूक प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे. दोन्ही लोकसभेतील प्रचाराचे काम कसे चालू आहे याची दैनंदिन अपडेट माहिती अभिषेक बोके व पार्थ पवार आणि विशेष अधिकारी यांना देण्याचे काम गेल्या तीन आठवड्यापासून सुरू आहे.

परंतु काल अभिषेक बोके यांच्या माध्यमातून जिजाऊ बंगल्यावर राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांना दोन्ही लोकसभा मतदारसंघातील संघटनात्मक पातळीवर होणाऱ्या प्रचार कार्य आणि काही इतर कामां संदर्भात अपडेट माहिती देण्याची संधी पार्थ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी काँग्रेस चे पदाधिकारी सोमनाथ लोहार यांना प्राप्त झाली.

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या माध्यमातून जे काम निवडणूक प्रक्रियेत केले त्याची सविस्तर महिती अजितदादांना देण्यात आली या कामाकरता विद्यार्थी कॉंग्रेस च्या पदाधिकार्यांमधून पश्चिम महाराष्ट्र राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष सोमनाथ लोहार यांना विशेष जबाबदारी देण्यात आली होती ती त्यांनी अतिशय कुशलतेने पार पाडली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व युवा नेते पार्थ पवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शिवाजी नगर मतदारसंघाचे अध्यक्ष डॉ. अभिषेक बोके यांनी सोमनाथ लोहार यांच्या कामाचे कौतुक केले.

राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम पाटील यांनी संधी दिली त्या बाबत मी यांचा ही रृणी आहे तसेच मुख्य सरचिटणिस विशालजी विहिरे यांनी काम करताना वेळोवेळी सहकार्य केले. विशेषतः माझ्या टिममध्ये सरचिटणिस केशव माने, चैतन्य पाटील व अमोलजी भोसले यांचे ही दादांनी कौतूक केले.

शेकापच्या पदाधिकाऱ्यांचा शब्द, मावळात फक्त 'मशाल' पेटणार

मुस्लिम अल्पसंख्याक बैठकीस उस्फूर्त प्रतिसाद

खोपोली/प्रतिनिधी

मावळ लोकसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठविण्यासाठी मतदारसंघात फक्त ''मशाल'' पेटणार, असा शब्द खोपोली येथील शेतकरी कामगार पक्षाचे नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष इब्राहिम पटेल आणि मुस्लिम अल्पसंख्याक समाजातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी दिला.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित मुस्लिम अल्पसंख्याक बैठकीस संजोग वाघेरे पाटील यांच्यासमवेत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कर्जत खालापूर विधानसभा उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, माजी नगरसेवक कमाल पटेल, तुराब पटेल, रशीद शेख यांच्यासह शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), काँग्रेस, शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मावळ लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, मी तुम्हाला खात्रीने सांगतो, गेल्या दहा वर्षात आपल्या अपेक्षांचा भंग झाला आहे. मला आपण जे सुचवाल ते मी करेन अशी ग्वाही वाघेरे पाटलांनी या वेळी दिली. तसेच मी तुमच्या खांद्याला खांदा लावून काम करेन. आपण मतभेद बाजूला सारून जास्तीत जास्त मतदान कराल अशी अपेक्षा व्यक्त केली.

मावळ लोकसभा मतदार संघात गेल्या दहा वर्षांत एकही एतेहासिक विकास काम खासदारांनी केलेले नाही. अनेक कामे रखडलेले आहेत. त्यांनी कायम दुर्लक्ष केले असून आपण खासदार झाल्यानंतर अशी कामे मार्गी लावण्यासाठी प्राधान्य द्यावे, अशा भावना मुस्लिम अल्पसंख्याक नेते आणि कार्यकर्त्यांनी या वेळी व्यक्त केल्या.

दरम्यान, खोपोली शहरातील विविध भागात उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी मुस्लिम समाजातील मान्यवरांच्या भेटी घेतल्या. या वेळी ठिकठिकाणी संजोग वाघेरे पाटील यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. सर्वच परिसरात वाघेरे पाटील यांनाच एकजुटीने लोकसभेत पाठविण्याचा निर्धार करण्यात आला.

भांडवलदारांच्या बाजूने जाणारे हे सरकार...

मावळ लोकसभा मतदारसंघातील खोपोली शहरातील पाण्याचा प्रश्न , औद्योगिक, वीज, रस्ते, प्रदूषण, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न आज तागायात सोडविला गेला नाही. ज्या पद्धतीने विकास झाला पाहिजे होता तो झालेला नाही. तरुणांचा नोकऱ्यांचा प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न आजही मार्गी लागला नाही. शिक्षणव्यवस्था सुधारलेली नाही. शिक्षण क्षेत्रात अव्वाच्या सव्वा फी वाढ झाली आहे. त्यावर या सरकारचे नियंत्रण नाही. हे सरकार भांडवल दरांच्या बाजूने चालणारे सरकार आहे. शेतकऱ्यांना पाहिजे, त्या गोष्टी मिळत नाहीत, असे प्रश्न महाविकास आघाडीच्या माध्यमातून मार्गी लावण्याचे आश्वासन उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी यावेळी दिले.

बोगदा परिसरात मधमाशांच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू

सातारा / प्रतिनिधी

मधमाशांनी केलेल्या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, म्हैशी चारायला गेल्यानंतर मधमाशांनी हल्ला केल्याने जखमी झालेले राघू बाबूराव जांगळे (वय ६३, रा. यादोगोपाळ पेठ, सातारा) यांचा उपचारावेळी मृत्यू झाला. ही घटना साताऱ्यातील मंगळवार पेठेतील बोगदा परिसरात घडली आहे.

बंद असलेल्या खाणीजवळ जांगळे म्हैशी चारायला गेले होते. यावेळी मधमाशांनी हल्ला केला होता. या घटनेची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

पुणे शहर परिसरात अवकाश उड्डाणावर निर्बंध : जिल्हाधिकारी यांचे आदेश

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २९ आणि ३० एप्रिल रोजी नियोजित पुणे दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर अति महत्वाच्या व्यक्तींची सुरक्षा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी २७ एप्रिल रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते ३० एप्रिल रोजी रात्री १२ वाजेपर्यंत पुणे शहर परिसरात पॅराग्लायडींग, हॉट बलुन सफारी, ड्रोन, मायक्रोलाईट एअरोप्लेन इत्यादी प्रकारच्या अवकाश उड्डाणावर निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.

या आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय दंड संहिता १८६० कलम १८८ च्या दंडनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही असेही जिल्हाधिकारी यांच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

अतिउच्चदाबाच्या ४०० केव्ही उपकेंद्रात बिघाड

पिंपरी, तळेगाव, चाकण परिसरात दीड तास वीजपुरवठा खंडित

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या (पीजीसीआयएल) तळेगाव अतिउच्चदाब ४०० केव्ही उपकेंद्रात बिघाड झाल्यामुळे शुक्रवारी (दि. २६) पिंपरी, चिंचवड, पिंपळे सौदागर, रहाटणी, वाकड, चाकण, तळेगाव, वडगाव, कामशेत, मरकळ, आकुर्डी या परिसरातील सुमारे १ लाख ३२ हजार ९०० ग्राहकांचा वीजपुरवठा दुपारी १.४९ ते ३.३० या कालावधीत खंडित झाला होता.

याबाबत माहिती अशी की, तळेगाव येथील 'पीजीसीआयएल'च्या अतिउच्चदाब ४०० केव्ही उपकेंद्रात आज दुपारी पावणे दोनच्या सुमारास बिघाड झाला. त्यामुळे महापारेषणच्या २२० केव्ही काठापूर, १३२ केव्ही सणसवाडी, १३२ केव्ही मरकळ, २२० केव्ही थेऊर, १३२ केव्ही यवत, १३२ केव्ही रहाटणी, २२० केव्ही उर्से, २२० केव्ही चिंचवड या अतिउच्चदाबाच्या उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद पडला.



परिणामी महावितरणच्या १८ उपकेंद्रांचा वीजपुरवठा देखील खंडित झाला. अतिउच्चदाबाच्या आठ उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद पडल्याने तब्बल ५२३ मेगावॅट विजेची पारेषण तूट निर्माण झाली. त्यामुळे पारेषण यंत्रणेतील संभाव्य धोके व बिघाड टाळण्यासाठी स्वयंचलित भारव्यवस्थापन यंत्रणा म्हणजेच 'एलटीएस' (Load Trimming Scheme) यंत्रणा कार्यान्वित झाली. त्यामुळे पिंपरी गाव, चिंचवड, पुनावळे, वाल्हेकरवाडी, रहाटणी, पिंपळे सौदागर, वाकड, ताथवडे, किवळे, रावेत, थेरगाव, सांगवी, आकुर्डी परिसर तसेच चाकण, कुरळी, नाणेकरवाडी, निघोजे, शेल पिंपळगाव, धावडी, तळेगाव, वडगाव, कामशेत शहर व परिसरातील सुमारे १ लाख ३२ हजार ९०० ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला.

त्यानंतर 'पीजीसीआयएल'च्या अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर तांत्रिक उपाययोजना करून दीड तासांत पर्यायी स्वरुपात वीजपुरवठा उपलब्ध करून दिला व महापारेषणच्या अतिउच्चदाबाच्या व त्यानंतर महावितरणच्या उपकेंद्रांचा खंडित झालेला वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत झाला. 'पीजीसीआयएल'च्या तळेगाव ४०० केव्ही उपकेंद्रातील बिघाड दुरूस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु असून महापारेषण कंपनीचे पुणे येथील एक पथक याकामी सहकार्य करीत आहे. आज रात्री उशिरापर्यंत उपकेंद्रातील दुरुस्तीचे काम पूर्ण होणार असल्याची माहिती देण्यात आली.

सावळजमध्ये कायदेविषयक शिबिर संपन्न

- दिवाणी न्यायाधीश ओमप्रकाश माळी यांची उपस्थिती; नागरिकांना कायदेविषयक माहिती

तासगाव / प्रतिनिधी

सावळज, ता. तासगाव येथे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, तासगाव बार असोसिएशन व ग्रामपंचायत सावळज यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या निमित्ताने दिवाणी न्यायाधीश ओमप्रकाश माळी यांनी उपस्थित नागरिकांना विविध कायद्यांची माहिती दिली.

यावेळी बोलताना माळी म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या न्याय हक्काच्या बाबी समजून घेणे आवश्यक आहे. महसूल अधिनियम, हिंदू लॉ, महिला विषयक कायदे याबाबत न्यायाधीश माळी यांनी सखोल मार्गदर्शन केले.

तासगाव बार असोसिएशनचे विधीज्ञ यावेळी बोलताना म्हणाले, वारसा हक्क व वाटप याबाबत अनेक कायदे अस्तित्वात आहेत. लोकांना बऱ्याचदा कायदेविषयक माहिती नसल्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागते. कायदेविषयक शिबिराच्या माध्यमातून नव्या पिढीला कायद्यांची माहिती मिळावी या हेतूने विधी सेवा समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विधीज्ञ एस. एम. पाटील, विधीज्ञ अतुल जाधव,अमित शिंदे, बी. बी.जाधव यांनीही महसूल अधिनियमन व अन्य कायद्या विषयी नागरिकांना सखोल मार्गदर्शन केले. विधीज्ञ विजय दिंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच विधीज्ञ बी.बी. पाटील यांनी आभार मानले.

या शिबिरासाठी सरपंच मीनल पाटील, उपसरपंच रमेश कांबळे, ग्रामविकास अधिकारी धनाजी निकम,कल्पना बुधवले, संजय थोरात, योगेश पाटील, अनिता भडके, प्रकाश पाटील, सिद्धगोंडा पाटील, सुनील केडगे, शुभम सरसंबी, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

कृषी अधिकारी संजय चव्हाण यांनी दुष्काळ निवारण व त्यावरील उपाय योजना तसेच नागरिकांसाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. वारंवार येणाऱ्या दुष्काळाच्या संकटाशी सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनी पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यावश्यक आहे. पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊनच शेतकऱ्यांनी पिकाचे नियोजन करणे गरजेचे आहे. यावेळी शासनाकडून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या अनेक योजनाची माहितीही संजय चव्हाण यांनी दिली.

सातारा जिल्ह्यात तब्बल ५० हजार नवमतदार; २० मतदान केंद्रांवर परंपरा चित्रीत होणार

सातारा : सातारा लोकसभा निवडणुकीसाठी सातारा जिल्ह्यात १८ लाख ५० हजार मतदार असून अठरा वर्षे पूर्ण करणारे ५० हजार नवतरुण पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. सातारा जिल्ह्यातील मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी दहा जणांचे एक पथक मतदार संघ निहाय लोकांच्या घरोघरी जाऊन मतदानासाठी आवाहन करणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी जिल्ह्याचे खर्च निरीक्षक उदयकुमार व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी भगवान कांबळे उपस्थित होते. डुडी पुढे म्हणाले सातारा जिल्ह्यातील २४३ मतदान केंद्रांवर ५०% पेक्षा कमी मतदानाची नोंद गतपंचवार्षिकला झाली होती. उन्हाचा वाढता तडाखा तसेच मतदानाची कमी टक्केवारी याकरता मतदान कसे वाढेल याकरिता जिल्हा प्रशासन सक्रिय आहे. तलाठी, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका तसेच महसूल कर्मचाऱ्यांचे एक पथक मतदार संघ निहाय पन्नास घरांना भेटी देऊन मतदान करा यासाठी आवाहन करणार आहे. सातारा जिल्ह्यात १८ लाख ५० हजार मतदार संख्या असून जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नामुळे १८ वर्षे पूर्ण केलेल्या ५० हजार नवमतदारांची नोंद झाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने २ मे रोजी महाविद्यालय निहाय प्राचार्य आणि नव मतदारांची बैठक घेऊन मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे यासाठी कार्यशाळा आणि जनजागृतीचे आवाहन करण्यात येत आहे. याशिवाय शासकीय मतदार साडेआठ हजार असून त्यांना कर्तव्य सेवेत असताना मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दिव्यांग तसेच अंधबांधव यांच्यासाठी घरातून मतदान करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

याशिवाय सातारा लोकसभा मतदारसंघासाठी १६ उमेदवार नामनिर्देशित झाले असून सकाळी ११ ते ५ या वेळेमध्ये त्यांच्या खर्चाचा तपशील नोंदवण्याचे काम सुरू आहे. याकरता आय.आर.एफ.एस. विभागाचे निर्देशक उदयकुमार यांची खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली असून त्यांचे काम सुरू झाले आह. सातारा जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर मतदारांनी ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या दरम्यान मतदान करावयाचे आहे. उन्हाळ्याचा तडाखा लक्षात घेऊन मतदान केंद्रावर मंडप उभारणी, रुग्णवाहिका, पंखे उन्हाची तीव्रता कमी करण्यासाठी ओ. आर. एस. पावडर तसेच काही सरबतांची सोय केली जाणार आहे. सातारा जिल्ह्यातील सुमारे साडेतीन हजार कर्मचाऱ्यांचे दोन टप्प्यात प्रशिक्षण जवळपास पूर्ण झाले असून काही कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण अद्याप बाकी आहे. याशिवाय सातारा जिल्ह्याला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे सातारा जिल्ह्याची संस्कृती आणि परंपरा दर्शवणाऱ्या काही घटना व प्रसंग याचे जिल्ह्यातील २० मतदान केंद्रांवर चित्र देखावा उभा केला जाणार आहे. कोणत्या मतदान केंद्रांवर हे करण्यात येणार आहे याची यादी २ मे रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. आतापर्यंत जिल्हा प्रशासनाच्या भरारी पथकाने १ लाख ३० हजार रुपयेचा विदेशी दारू रोख रक्कम व इतर साहित्य जप्त केले आहे. जिल्ह्यात सहाभरारी पथके तैनात असून जिल्ह्याच्या हद्दीवरील वेगवेगळ्या चेक नाक्यांवर वाहनांची तपासणी करण्यात येत आहे.

सातारा जिल्ह्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बोलताना जिल्हाधिकारी म्हणाले कोयना धरण वगळून जिल्ह्यातील वेगवेगळ्या धरणांमध्ये चार टीएमसी पाणीसाठा शिल्लक असून माण खटाव सांगलीचा काही भाग येथे पाणी पुरेल असे नियोजन केले होते. जलसिंचन विभागाकडून मार्चमध्येच माण खटाव तालुक्यातील तलावांची माहिती व त्याला लागणारे उपलब्ध पाणी याचा आराखडा तयार करून ते तलाव भरून घेण्यात आले होते. जिहे कटापूर तारळी या दोन धरणांचे काम पूर्ण झाल्यामुळे पाच टीएमसी पाणीसाठा उपलब्ध झाला होता त्या पाण्याचा उपयोग करून जिल्ह्यात कोठेही पाणीटंचाई जाणवणार नाही यासाठी उपाय योजना सुरू आहेत. त्यामुळे सातारा जिल्ह्यात टँकरची संख्या वाढलेली नाही सातारा जिल्ह्यात चार लाख टन चारा तयार झाला असून आवश्यक ठिकाणी गावांमध्ये चारा छावण्या उभारण्याच्या परवानगी देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना मुरघास उत्पादन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत तसेच शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी पेरणी यंदाच्या संदर्भात समन्वय ठेवावा म्हणजे आगामी खरीप हंगामाचे त्यांचे नुकसान होणार नाही असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

‘मोदी कालखंड’ हा देशहिताचा ठरला नाही - खा. शरद पवार

पाटण येथील जाहीर सभेत बोलताना खा. शरद पवार, व्यासपीठावर आ. पृथ्वीराज चव्हाण, आ. शशिकांत शिंदे, विक्रमसिंह पाटणकर, खा. श्रीनिवास पाटील, सत्यजितसिंह पाटणकर आदी मान्यवर समोर उपस्थित जनसमुदाय. (छाया : देवव्रत खांडके, पाटण)

पाटण/प्रतिनिधी

देशात आज मोठ्या प्रमाणावर राजकीय अराजकता माजली असून मोदी कालखंड हा देश हिताचा ठरला नसल्याने देशाची सत्ता पुन्हा मागण्याचा नैतिक अधिकार त्यांना नाही. सातारा जिल्हाच नव्हे तर महाराष्ट्राला स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची परंपरा असून आता निवडणूक काळात काहींना यशवंतराव चव्हाण यांना ‘भारतरत्न’ देण्याची आठवण होतेय ही आनंदाची बाब आहे. स्व. यशवंतरावांचे विचार व परंपरा जोपासायची असेल तर या मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनाच संसदेत पाठवा, असे आवाहन राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रमुख माजी केंद्रीय मंत्री खा. शरद पवार यांनी केले.

पाटण येथे महाविकास आघाडीच्या वतीने आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण, माजी पालकमंत्री आ. बाळासाहेब पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर , महाविकास आघाडीचे उमेदवार आ. शशिकांत शिंदे, आ.अरुण लाड, राष्ट्रवादीचे नेते सत्यजितसिंह पाटणकर, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे राज्याचे प्रमुख सारंग पाटील, शिवसेना उ.बा. ठा. पक्षाचे जिल्हाप्रमुख हर्षद कदम, श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर, राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेश जाधव, प्रांतिक प्रतिनिधी हिंदुराव पाटील, दिपक पवार, राजेंद्र पवार आदी मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना खा. शरद पवार पुढे म्हणाले, यशवंतरावांचे विचार जोपासणे हे निश्चितच आव्हानात्मक आहे आणि ते आव्हान एक सर्वसामान्य म्हणून आम्ही आतापर्यंत जोपासत आलो आहोत. सध्या राज्यातील असो अथवा केंद्रातील सरकार हे मतलबी व आराजकता माजवणारे आह. ही निवडणूक प्रामुख्याने प्रचंड महागाई, बेरोजगारी, जातीयवाद या प्रमुख मुद्द्यांवर होत असल्याने याचा सर्वसामान्य मतदारांनी अतिशय गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. आजचे पंतप्रधान राहुल गांधी, गांधी घराणं व नेहरूंच्यावर टीका टिप्पणी करण्यात मशगुल आहे. ज्या माणसांनी व कुटुंबाने आपल्या स्वातंत्र्यात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली दुर्दैवानं त्यांच्यावरच टीका, टिंगल टवाळी करणे हे या देशातल्या जनतेला कधीही मान्य होणार नाही. आजच्या या महागाईत महिला घर तर सर्वसामान्य जनता वाहनं चालवू शकत नाहीत. सन २०१४ च्या तुलनेत आज प्रचंड महागाई वाढली आहे देशातील ८७ टक्के तरुण बेरोजगार आहेत. जातीयवाद, धार्मिकता यावरच आज हा देश चालवला जात आहे. ज्या गांधी, नेहरू घराण्यांनी आपल्या त्यागाची स्वातंत्र्यात मोलाची भूमिका बजावली दुर्दैवाने त्यांचीच टिंगल टवाळी टीका करण्यात आजच्या राज्यकर्त्यांना धन्यता वाटते हे दुर्दैव आहे. विद्यमान पंतप्रधान त्या पदाची गलिमा राखू शकले नाहीत, त्यामुळे यापुढे देश नक्की कोणाच्या हातात द्यायचा हे ठरवणारी येणारी लोकसभेची निवडणूक असल्याने निश्चितच सातारा जिल्हाच नव्हे तर राज्य व देशातही परिवर्तन अपेक्षित आहे. या अपेक्षित परिवर्तनामध्ये शशिकांत शिंदे सारख्या एका अभ्यासू, परखड व्यक्तिमत्वाला आपण संसदेत बहुमताने पाठवा असे आवाहनही शेवटी शरद पवार यांनी केले. यावेळी बोलताना आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की सध्या राज्यात फक्त पक्ष फोडणे, खोकी, ई. डी., सि. बी. आय. सारख्या संस्थांच्या दबाव व आमिष दाखवण्यापलीकडे काहीच घडत नाही. सत्ताधाऱ्यांनी भलेही आमदार, नेते फोडले असले तरी सर्वसामान्य मतदार मात्र या सर्वांची चीड बाळगून आहेत. आता राज्यघटना बदलण्याची हिंमत करणाऱ्या व लोकशाहीसाठी घातक असलेल्या विघातक वृत्तींविरुद्ध ही निवडणूक होत असल्यामुळे तुम्ही आम्ही बेसावध न राहता अत्यंत जबाबदारीने चांगल्या खासदारांना विजय करण्यासाठी सर्वस्व समर्पित करणे गरजेचे आहे. सध्याचे पालकमंत्री आपल्या पदाचा वापर, गैरवापर करत असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार या अनैतिक सरकार विरोधात आपल्याला लढायचं असेल तर पाटण मतदारसंघातून प्रचंड अपेक्षा आहेत. महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, भ्रष्टाचार, अनैतिकता, आर्थिक बट्ट्याबोळ असे महाराष्ट्रातील जे नाट्यमय राजकारण सुरू आहे ते केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्याच आशीर्वादाने होत असल्याने आता या गद्दारांना धडा शिकवण्यासाठी शशिकांत शिंदे सारख्या प्रामाणिक माणसाला आपण निवडून देणे सार्वत्रिक हिताचे ठरणार आहे. या निवडणुकीच्या निकालात गद्दारांना त्यांची जागा दाखवण्याची खरी जबाबदारी आपल्या या मतदारसंघातील सर्वसामान्य मतदाराच्या हातात आहे, त्यामुळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना उ. बा. ठा. पक्ष आदी सर्वच मित्र पक्षांचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे बूथ कमिट्या करून, सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहोचून ही निवडणूक महाविकास आघाडीच्या विजयाची करावी असे आवाहन त्यांनी केले.

आ. शशिकांत शिंदे म्हणाले, पवार साहेबांशी निष्ठावंत कसा असावा हे आजवर विक्रमसिंह पाटणकरांनी तर शेलार मामा कसा असावा हे श्रीनिवास पाटील यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या याच तालुक्यात सत्ताधारी राज्य व केंद्र सरकारच्या विरोधात प्रचंड जनतेचा रोष आहे. तो रोष घालवत नव्याने क्रांती करायची असेल तर माझ्यासारख्या सामान्य माथाडी व कायमचं पवारांशी एकनिष्ठ असलेल्या उमेदवाराला निवडून देण्यासाठी आपण सर्वजण प्रामाणिकपणे प्रयत्न कराल. माझ्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून जाणीवपूर्वक कारवाया केल्या जात आहेत मात्र माझा जीव गेला तरी चालेल पण मी पवार साहेबांची साथ कधीही सोडणार नाही. आपल्या सत्तेचा गैरवापर करत माझ्यावर कितीही केसेस टाकल्या तरीही मी मरेपर्यंत पवार साहेबांचा कट्टर व निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून राहील. ही निवडणूक शरद पवार, राहुल गांधी, उद्धव ठाकरे तसेच आपल्या लोकसभेसाठी माझ्यासाठी तितकीच महत्त्वाची असून पाटणची जनता या निवडणुकीत क्रांती करेल. कराड आणि पाटणचे मताधिक्य ही माझ्या विजयाची खरी नांदी असेल आणि माझी लढाई तत्त्वाची, शरद पवार नेत्याची आणि साताऱ्याच्या स्वाभिमानाची असल्याने आपण सर्वजण माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहाल याची मला खात्री आहे.

सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, आपल्या सर्वांचेच भवितव्य ठरवणारी निवडणूक ही असून चारशे पारचा नारा देणाऱ्यांना या निवडणुकीत आपण धडा शिकवू. सर्वसामान्य माणूस व लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी ही निवडणूक अतिशय महत्त्वाची असून देशात, राज्यात व जिल्ह्यातही राजकीय मुजोरी वाढली आहे, गद्दारांची फौज, पक्ष फोडा व वाट्टेल ते थराला जाऊन काम करत असून या निवडणुकीत गद्दारांना थारा न देता सर्वसामान्य जनतेचे प्रश्न समजून घेणारे, आपल्या सुखदुःखात सहभागी होत आंदोलने, उपोषणात आपल्या पाठीशी ठाम उभे राहण्यासाठीच शशिकांत शिंदे यांना निवडून देत पाटण तालुका या निवडणुकीत मताधिक्याचा सिंहाचा वाटा उचलेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

डॉ. भारत पाटणकर म्हणाले, हुकूमशाहीचा पराभव करत लोकशाहीचा विजय करण्यासाठीची ही निवडणूक आहे. सध्या देशात मोदी शहांसह आदानी, अंबानीसारखी हाताच्या बोटावर मोजणारी माणसं आपला देश चालवतायेत, त्यामुळेच महागाई, बेरोजगारी, अत्याचार ,जातीयवाद वाढला आहे. पाटण मतदारसंघात तर सर्वाधिक हुकूमशाही पहायला मिळत आहे. निवडणुका आल्यावर स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांना भारतरत्न देण्याची मागणी करतात मग त्यांच्या काळात त्यांचे हात अथवा तोंड कोणी बांधले होते हा विचार करणे गरजेचे आहे. येणाऱ्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा विजय हा आपल्या सर्वांच्या सार्वत्रिक हिताचा ठरणार आहे.

यावेळी माजी पालकमंत्री आ. बाळासाहेब पाटील, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, हर्षद कदम आदी मान्यवरांची भाषणे झाली. स्वागत सुभाषराव पवार यांनी तर आभार प्रदर्शन राजाभाऊ शेलार यांनी केले.

महामेळाव्यास राष्ट्रवादी पवार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना उ. बा. ठा. पक्षाचे पदाधिकारी, राष्ट्रीय काँग्रेसचे नरेश देसाई, श्रीनिवास पाटील, सेनेचे सुरेश पाटील, बाळासाहेब राजे महाडिक ॲड. अविनाश जानुगडे, सौ. स्नेहल जाधव, दिनकरराव घाडगे, सुभाषराव पवार, टाटाचे कामगार नेते सुजित पाटील, माजी शिक्षण सभापती राजेश पवार, नगराध्यक्षा सौ. मंगल कांबळे, उप नगराध्यक्ष सागर पोतदार तसेच महाविकास आघाडी मित्र पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते व हजारोंच्या संख्येने पाटण विधानसभा मतदारसंघातील लोक उपस्थित होते.

पिंपोडे येथे टँकरद्वारे मोफत दररोज ५० हजार लिटर पाणी वाटप

डॉ. सुयोग लेंभे मित्रसमूह उपक्रम

कोरेगाव : पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर येथे डॉ. सुयोग लेंभे मित्र समूहामार्फत टँकरने मोफत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. दररोज ५० हजार लिटर पाणी उपलब्ध होऊ लागल्याने ऐन यात्रा काळात ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यासाठी रोज आठ हजार रुपये खर्च केले जात आहेत. गतवर्षी पावसाने दडी मारल्याने यंदा सर्वत्र पाणीटंचाई जाणवत आहे.

कोरेगावच्या उत्तर भागात शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्याने पाण्याची मागणीदेखील वाढत आहे. त्यामुळे शासकीय टँकर अपुरे पडू लागले आहेत. पुढील आठवड्यात गावची वार्षिक यात्रा आहे. तसेच लग्नसराई सुरू आहे. त्याकरिता नातेवाईक व चाकरमान्यांचा गावाकडे राबता आहे. अशावेळी सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून डॉ. सुयोग लेंभे यांच्या संकल्पनेतून गावात मोफत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. पाच हजार लिटरच्या टँकरद्वारे गावातील पाचही वॉर्डमध्ये तसेच वस्त्यांवर गरजेनुसार रोटेशन पद्धतीने रोज दहा टँकर पाणी वितरित केले जात आहे. या माध्यमातून ग्रामस्थांना दररोज ५० हजार लिटर पाणी घरपोच मिळत असून डॉ. सुयोग लेंभे मित्र समूहाला त्यासाठी रोज आठ हजार रुपये खर्च येत आहे. येत्या १५ मे पर्यंत या पद्धतीने पाणीवाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानंतर पावसाची परिस्थिती पाहून पुढील नियोजन करण्यात येणार असल्याचे उपसरपंच रणजित लेंभे यांनी सांगितले.

> “ गावात तीव्र पाणीटंचाई आहे. शासकीय टँकरचे पाणी पुरत नाही. महिलांसह सर्वांना पाण्याच्या शोधात फिरावे लागत आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य लक्षात घेऊन हा उपक्रम राबवला आहे.
> – डॉ. सुयोग लेंभे, पिंपोडे बुद्रुक.

गेल्या दोन महिन्यांपासून ग्रामस्थांना बॅरलला ५० रुपये देऊन पाणी विकत घ्यावे लागत होते. पाण्यावर होणारा खर्चात बचत झाली आहे. त्यामुळे पाणीटंचाई शिगेला पोचली असताना डॉ. सुयोग लेंभे मित्र समूहाने राबवलेल्या या विधायक उपक्रमाचे ग्रामस्थांमधून कौतुक होत आहे.

श्रीराम पतसंस्थेचे माजी संचालक विलासराव थरवल यांचे निधन

पाटण/प्रतिनिधी

येथील श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेचे माजी संचालक तसेच हनुमान सेवा मंडळाचे ज्येष्ठ सभासद, मार्गदर्शक विलासराव गणपती थरवल (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

येथील एसटी कॅन्टीन व शहरातील गुरुकृपा बेकरीचे मालक तसेच यशस्वी व्यावसायिक असलेल्या विलासराव थरवल यांचा शहरातील सामाजिक क्षेत्रात तसेच हनुमान सेवा मंडळाच्या धार्मिक कार्यात सक्रीय सहभाग होता. शहर व परिसरात ते ’अण्णा’ नावाने परिचित होते.

त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त करण्यात येत असून शहरातील विविध संस्था तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दुःख व्यक्त केले.

थरवल यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, भाऊ, भावजयी, पुतणे असा मोठा परिवार आहे.

जिल्ह्यातील दोन पोलिस अधिकाऱ्यांसह ११ जणांना महासंचालक सन्मानचिन्ह

सातारा : जिल्हा पोलिस दलात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील दोन अधिकारी आणि ९ कर्मचाऱ्यांना २०२३ वर्षासाठी पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे.

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी २०२३ वर्षातील पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर केले आहेत. राज्यातील ८०० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हे पदक मिळाले आहे. यामध्ये सातारा जिल्हा पोलिस दलातील ११ जणांचा समावेश आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अरुण देवकर यांना हे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. तसेच सातारा तालुका पोलिस ठाण्यात कार्यरत असणारे व सध्या सोलापूर जिल्हा पोलिस दलातील निरीक्षक विश्वजीत घोडके यांनाही हे सन्मानचिन्ह मिळाले आहे. तर संजय टिळेकर, कमलाकर कुंभार, भरत शिंदे, श्रीधर ठोंबरे आणि नंदकुमार महाडिक या सहायक पोलिस उपिनरीक्षकांनाही हा सन्मान जाहीर झालेला आहे. हवालदार महादेव घाडगे, विनोद राजे आणि पोलिस शिपाई बिपीन ढवळे व मंगेश जाधव यांनाही पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह मिळाले आहे. यामुळे सातारा जिल्हा पोलिस दलाचा गौरव वाढला आहे.

विक्रेत्यांकडून रत्नागिरी हापूसच्या नावाखाली ग्राहकांची लूट

मसूर/प्रतिनिधी

कोकणातील हापूस आंब्याला वाढती मागणी आहे. मात्र कर्नाटकमधला आंबा कोकणातील असल्याचा भासवून ग्राहकांच्या माथी मारण्याचे काम आंबे विक्रेत्याकडून सुरू आहे. मुख्यता आर्थिक लुट सुरू आहे. बहुतांश व्यापाऱ्यांनी ग्रामीण भागात आंब्याचे गुदाम थाटले आहे. बलसाड, बंगळुरू, कर्नाटकमधल्या आंब्यांची सर्रास विक्री सुरू आहे. त्याचबरोबर मसूरच्या आठवडा बाजारात परप्रांतीय व्यापारी मोठ्या प्रमाणात आंबे विकण्यासाठी येत आहेत. अवघ्या चार महिन्यांत या व्यापाऱ्यांनी हजारो रुपयांचा व्यवसाय केला आहे.

बाजारात ग्राहकांना रत्नागिरी हापूस म्हणून कर्नाटकी आंबा दिला जातो. दिसायला हुबेहूब देवगड हापूसप्रमाणे दिसणाऱ्या कर्नाटकी आंब्याचा दर कमी असतो. मात्र हाच आंबा चढत्या दराने विकला जातो. नागरिकही रत्नागिरी हापूस म्हणून तो घरी घेऊन जातात. मात्र आंब्यास कीड लागणे, गोडीला कमी असणे, चव बरोबर नसणे यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येते.

> “ रत्नागिरीच्या हापूस आंब्याला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. प्रामाणिकपणाने ५० हजारहून अधिक आंबा आणून विकला. आता काही विक्रेते हापूसच्या नावाखाली कर्नाटक आंबा विकत आहेत. त्यामुळे रत्नागिरी हापूस आंब्याला मागणी असताना देखील योग्य दर मिळत नाही. कर्नाटकचा आंबा रत्नागिरी हापूस म्हणून विकणाऱ्यांवर प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.
> – राम धरणे, हापूस आंबा विक्रेते

कर्नाटकमधील आंबे रासायनिक प्रक्रियेद्वारे पिकविलेले असल्याने असे आंबे खाल्ल्याने पोटाच्या विकारांसह कर्करोगासारखे गंभीर आजारही बळावण्याची शक्यता आहे. या प्रक्रियेद्वारे पिकविलेल्या आंब्यांमुळे लहान मुलांच्या पोटात दुखणे, मळमळ होणे, चक्कर येणे, उलटी होणे अशा आजारांचे लक्षण निदर्शनास येतात. असे जाणकारांनी मत व्यक्त केले आहे. अन्न औषध प्रशासन विभागाने याकडे का दुर्लक्ष केले? प्रशासन यावर कारवाई करणार का? हा देखील लोकांच्या प्रश्न निर्माण झाला आहे.

पाटणच्या श्री लक्ष्मी-निनाईदेवीची १६ व १७ मे रोजी यात्रा

▪ यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी चंद्रकांत मोरे तर उपाध्यक्षपदी राजेंद्र राऊत

पाटण/प्रतिनिधी

पाटणचे ग्रामदैवत श्रीलक्ष्मी-निनाई देवीची यात्रा पुढील महिन्यात गुरुवार दि. १६ मे ते शुक्रवार दि. १७ मे २०२४ रोजी सालाबादप्रमाणे साजरी होत असून यात्रा नियोजनासाठी ग्रामस्थांची नुकतीच बैठक झाली. या बैठकीत यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी माजी सरपंच चंद्रकांत मोरे, उपाध्यक्षपदी नगरसेवक राजेंद्र राऊत तर खजिनदार पदी नामदेव कुंभार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी गुरुवार दि. १६ मे रोजी दुपारी २ वा. पाटणच्या वेशीवर श्रीभैरवनाथ देवाची पालखी व सासन काठीचे स्वागत, सायंकाळी ४.३० वा. श्रीलक्ष्मी-निनाई, श्रीभैरवनाथ देवांचे पाटण शहरातून पालखी मिरवणूक व छबीना, रात्री श्रीलक्ष्मी देवी मंदिरात गोंधळ व करमणूक कार्यक्रम तर दुसऱ्या दिवशी शुक्रवार दि. १७ मे रोजी खेळणे व मोडयात्रा अशा कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी ग्रामस्थांनी यात्रा नियोजनाची बैठक श्रीमंत नागोजीराव पाटणकर वाचनालयात घेतली. यावेळी नवीन यात्रा कमिटी निवडण्यात आली. व या बैठकीत यात्रा सुसज्ज, सुस्थितीत,भव्य व शांततेच्या मार्गाने होण्यासाठी ग्रामस्थांची चर्चा झाली. यात्रेसाठी पाटण शहरातून किमान घरटी पाचशे रुपये यात्रा पट्टी घोळा करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला सर्व उपस्थितांनी सहमती दिली.

यावेळी बोलताना यात्रा कमिटीचे अध्यक्ष चंद्रकांत मोरे म्हणाले श्रीलक्ष्मी-निनाई, भैरवनाथ देवाची यात्रा सालाबादप्रमाणे उत्साहात सुसज्ज, सुस्थितीत,भव्य व शांततेच्या मार्गाने साजरी करण्याचा यात्रा कमिटीचा प्रयत्न राहणार आहे. यासाठी शुक्रवारी दि. २६ ऐप्रील रोजी सकाळी १० वा. श्रीलक्ष्मी देवी मंदिरात श्रीफळ अर्पण करून यात्रेच्या प्रत्यक्ष कामास सुरवात होणार आहे, असे आवाहन यावेळी मोरे यांनी केले.

यावेळी उपनगराध्यक्ष सागर पोतदार, माजी उपनगराध्यक्ष सचिन कुंभार, नगरसेवक स्वप्नील माने, संजय इंगवले, राजेंद्र गायकवाड, काका शेंडे ग्रामस्थ दिपकसिंह पाटणकर, गणेश मोरे, राजेंद्र पाटणकर, विक्रम जाधव, लक्ष्मण चव्हाण, प्रकाश जाधव, वामनराव भिसे, शंकर कांबळे, पप्पू जगताप, तानाजी गुरव, संतोष इंदुलकर, पराग चव्हाण, अनिल बोधे, दत्ता कवडे, ओंमकार देसाई यांच्यासह आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी

सातारा : खर्च निरीक्षक कुमार उदय यांच्या उपस्थितीत ४५ सातारा लोकसभा मतदारसंघातील सर्व उमेदवारांची निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडली.

सदर तपासणीस एकूण १६ उमेदवारांपैकी १४ उमेदवार उपस्थित होते.

अनुपस्थित उमेदवारांना तसेच खर्चात तफावत असणाऱ्या उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्फत नोटीस देण्यात आलेली आहे व सदर नोटीसीचा खुलासा ४८ तासांमध्ये करण्यासाठी सूचित करण्यात आलेले आहे.

तपासणीनंतर उमेदवारांच्या खर्चाचे दैनंदिन नोंदवही मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

एलसीबीच्या कोंबिंग ऑपरेशनमध्ये साताऱ्यात दोन पिस्टल जप्त

दोघेजण ताब्यात

सातारा : स्थानिक गुन्हे शाखेने गेंडामाळ आकाशवाणी या ठिकाणी केलेल्या कोंबिंग ऑपरेशन मध्ये संशयित दोघांकडून देशी बनावटीच्या दोन पिस्टल तीन जिवंत काडतुसे,एक रिकामी मॅक्झिन व मोटरसायकल असा १ लाख ९५ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ओमकार राजाराम काकडे, वय २१ राहणार शिरटे तालुका वाळवा जिल्हा सांगली, गोरख सिताराम महाडिक, वय ४० राहणार गोटेघर पोस्ट रांजणी तालुका जावळी या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी सातारा जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने लागू आचारसंहिता या संदर्भात अग्निशस्त्र संबंधित कडक कारवाया करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे २५ एप्रिल रोजी रात्री नऊ वाजता सातारा शहरातून कोंबिग ऑपरेशनं सुरू होते. सहायक पोलीस निरीक्षक रोहित फाळणे, विश्वास शिंगाडे, अमित पाटील, मदन फाळके, तानाजी माने हे पथक आकाशवाणी गेंडामाळ नाका येथे फिरत असताना शाहूपुरी ते आदर्श कॉलनी रस्त्यावर दोन इसम काळ्या रंगाच्या होंडा एक्टिवा गाडीवरून जाताना दिसले .पोलिसांनी त्यांना थांबवून एका इसमाची अंग झडती घेतली असता त्याच्याकडे देशी बनावटीची दोन पिस्टल, तीन जिवंत काडतुसे, एक रिकामे मॅगझिन आढळून आले हिरो मोपेडसह अन्य साहित्य असा १ लाख ९५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला .या दोघांवर शाहूपुरी पोलीस ठाण्यामध्ये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. नोव्हेंबर २०२२ पासून ८२ देशी बनावटीची पिस्तुले, ३ बारा बोर रायफल, १९४ जिवंत काडतुसे व ३७७ रिकामी पुंगळ्या जप्त करण्यात आले आहेत .

या कारवाईत प्रवीण फडतरे अमित झेंडे अरुण पाटील अमित माने अविनाश चव्हाण गणेश कापरे अमित सपकाळ स्वप्नील कुंभार मोहन पवार ओंकार यादव रोहित निकम विशाल पवार वैभव सावंत सचिन ससाने मयुर देशमुख शिवाजी गुरव विजय निकम यांनी भाग घेतला होता.

टाटा समूह देशभरात चार्जिंग स्टेशन उभारणार

'टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेड'ने 'शेल इंडिया मार्केट्स प्रा. लि.' या कंपनीबरोबर भागीदारी करार केला आहे. त्यामागे देशभरात चार्जिंग स्टेशन्स उभी करण्याचा विचार आहे. या योजनेसाठी टाटा समूहाची कंपनी 'टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेड'ने अलीकडेच 'शेल इंडिया मार्केट्स प्रायव्हेट लिमिटेड'सोबत सामंजस्य करार केला आहे.

इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी दोन्ही कंपन्या सुविधा निर्माण करतील. सध्या रेंज आणि चार्जिंगच्या समस्यांमुळे लोक इलेक्ट्रिक वाहने वेगाने स्वीकारत नाहीत. ईव्ही वाहनांच्या कमी विक्रीमागील महत्त्वाचे कारण म्हणजे चार्जिंग स्टेशन्सची कमतरता. या भागीदारीअंतर्गत, टाटा पॅसेंजर आणि शेल इंडिया या दोन्ही कंपन्या लोकांना इलेक्ट्रिक वाहनांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करतील. दोन्ही कंपन्यांनी सोयीनुसार पेमेंट सिस्टीम आणि लॉयल्टी प्रोग्राम सुरू करण्याची योजना आखली आहे.

दोन्ही कंपन्यांमधील या भागीदारीद्वारे, 'शेल'चे देशव्यापी इंधन स्टेशन नेटवर्क आणि टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटीचे चार्जिंग स्टेशनचे नेटवर्क टाटाच्या १.४ लाख इलेक्ट्रिक वाहनांचा तपशील वापरून भारतीय रस्त्यांवर धावणार आहेत. टाटा कंपनीचे म्हणणे आहे की टाटा इलेक्ट्रिक वाहनांचा वावर ज्या रस्त्यावर अधिक आहे, त्या रस्त्यावर चार्जिंग स्टेशन्स बांधली जातील. इलेक्ट्रिक प्रवासी वाहनांच्या बाबतीत टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटीचा बाजारहिस्सा ७१ टक्के आहे. कंपनीने गुरुग्राममध्ये

आपले पहिले ईव्ही विशेष स्टोअर सुरू केले आहे. कंपनीने देशातील चार्जिंग पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी अनेक चार्ज पॉइंट ऑपरेटर्ससोबत काम केले आहे.

'शेल इंडिया' ही जागतिक ऊर्जाक्षेत्रातील कंपनी 'शेल'ची उपकंपनी आहे. 'एनर्जी सोल्युशन्स' आणि इन्फ्रा डेव्हलपमेंटमध्ये या कंपनीचे कौशल्य आहे. शेलची ईव्ही रिचार्ज स्थाने अल्ट्रा-फास्ट चार्जिंग देतात. टाटा समूह आणि शेल इंडिया या दोन्ही कंपन्यांच्या एकत्र येण्यामुळे आर्थिक वाढीला मदत होईल आणि ईव्ही क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण होतील. चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चरमुळे बांधकाम, देखभाल आणि ऑपरेशन्समध्ये रोजगाराच्या संधीदेखील निर्माण होतील. यामुळे संबंधित उद्योगांमध्ये नवकल्पना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळेल. ही भागीदारी इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देईल. वाहनांचे उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टालाही मदत करेल.

डाळी कडाडल्या

सरकार ॲक्शन मोडवर

निवडणुकीच्या काळात विविध डाळींच्या वाढत्या किमती सरकारला सतावत आहेत. त्यामुळे डाळींच्या किमती आटोक्यात आणण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत आहे. आता ग्राहक व्यवहार सचिवांनी यासंदर्भात विविध पक्षांसोबत बैठक घेऊन साठा आणि उपलब्धतेचा आढावा घेतला आहे.

अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, डाळी व्यापाऱ्यांसह विविध भागधारकांच्या सहकार्याने उपलब्धतेचे पुनरावलोकन केले गेले आहे. यासाठी ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे यांनी डाळ उद्योगाच्या प्रतिनिधींची बैठक घेतली आहे. त्याचे पालन न केल्यास कारवाई केली जाईल. तत्पूर्वी, केंद्र सरकारने सर्व राज्यांना साप्ताहिक आधारावर व्यापाऱ्यांकडून विविध डाळींचा साठा जाहीर करण्याची खात्री करण्याचे निर्देश दिले होते. केंद्र सरकारने तूरडाळ, उडीद डाळ, चना डाळ, मसूर डाळ आणि मूग डाळीच्या साठ्यावर लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले होते. याच संदर्भात नुकतीच बैठक झाली. त्यात सचिवांनी डाळ उद्योगाच्या प्रतिनिधींना सांगितले की सूचनांचे पालन न करणाऱ्या व्यापाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत कठोर कारवाई केली जाईल. डाळींच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून खरे यांनी मागील आठवड्यात राज्यांचे प्रधान सचिव आणि ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिवांची बैठक घेतली होती. त्यांनी सर्व राज्य सचिवांना स्टॉकहोल्डिंग संस्थांद्वारे स्टॉक प्रकटीकरण सुनिश्चित करण्यास सांगितले होते. गेल्या काही आठवड्यांपासून विविध डाळींच्या किमतीत वाढ झाली आहे. गेल्या दीड महिन्यात त्यांच्या भावात १०० रुपयांनी वाढ झाली आहे. महागाईच्या आकडेवारीतही हे दिसून येते. मार्च महिन्यात डाळींची किरकोळ महागाई १८.९९ टक्क्यांवर पोहोचली आहे. फेब्रुवारी महिन्यात डाळींची घाऊक महागाई १८.४८ टक्क्यांवर पोहोचली होती. सचिवांनी म्यानमारमधील भारतीय मिशनसोबत डाळींच्या आयातीवरही चर्चा केली. सुधारित विनिमय दरानुसार, म्यानमारमधून आयात होणाऱ्या वस्तूंच्या किमती ठरवण्यासारख्या मुद्द्यांचा या चर्चेत समावेश होता.

पाकिस्तान आशियातील सर्वात महागडा देश

माणसाला जगण्यासाठी सर्वात महत्त्वाचे काय हवे असते? दिवसाचे दोन वेळचे जेवण, डोके लपवण्यासाठी छप्पर आणि अंग झाकण्यासाठी कपडे. एखाद्या देशात ते गोळा करण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील तर तेथील लोकांचे जीवन किती त्रासदायक असेल? पाकिस्तानमध्ये अशीच परिस्थिती आहे. तो आता राहण्यासाठी आशियातील सर्वात महागडा देश बनला आहे.

आशियाई विकास बँकेने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे की राहणीमानाचा खर्च पाकिस्तानमध्ये सर्वाधिक आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे येथील महागाईचा उच्च दर. पाकिस्तानमध्ये चलनवाढीचा दर २५ टक्के आहे. त्यामुळे येथील चलनाचे मूल्य दरवर्षी कमी होत आहे. परिणामी लोकांना रेशन आणि इतर जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो; मात्र पाकिस्तानची अर्थव्यवस्था १.९ टक्के दराने वाढू शकते. याबाबत एडीबीच्या अहवालात काही प्रमाणात समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

पाकिस्तानच्या 'एक्स्प्रेस ट्रिब्यून' या वृत्तपत्राने 'एडीबी'च्या अहवालाचा हवाला देत लिहिले आहे की, 'एशियन डेव्हलपमेंट आऊटलूक'ने पाकिस्तानसाठी पुढील आर्थिक वर्षासाठी निराशाजनक चित्र मांडले आहे. या कालावधीत देशातील चलनवाढीचा दर १५ टक्के, तर जीडीपीवाढीचा दर २.८ टक्के राहण्याचा अंदाज आहे. सध्याच्या परिस्थितीपेक्षा हे चांगले असेल. पाकिस्तान दीर्घकाळापासून चलनवाढीमुळे मंदीत आहे. जागतिक बँकेनेही गेल्या आठवड्यात म्हटले होते की, महागाईमुळे येथील एक कोटी लोक गरिबीत अडकू शकतात. पाकिस्तानमधील सुमारे ९८ दशलक्ष लोक आधीच गरिबीत जगत आहेत. देयकांचा समतोल ढासळल्यामुळे पाकिस्तानचे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. अवाजवी कर्जामुळे त्यांची अवस्था बिकट झाली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून मिळालेल्या तीन अब्ज डॉलरच्या बेल आऊट पॅकेजसाठी निश्चित केलेल्या अटींच्या आधारे पाकिस्तान सध्या काम करत आहे. त्यासाठी तेथे पेट्रोल आणि डिझेलच्या दरातही वाढ करण्यात आली आहे.

दुष्काळातही महाराष्ट्रात साखर उत्पादन जादा

कर्नाटकमधील कमी उत्पादनामुळे चालू हंगामात १५ एप्रिलपर्यंत देशातील साखरेचे उत्पादन तीन कोटी दहा लाख टन झाले आहे. दुष्काळी परिस्थिती असतानाही महाराष्ट्राने सर्वांचे अंदाज चुकवून एक कोटी नऊ लाख टन साखर उत्पादन केले आहे.

भारत हा जगातील प्रमुख साखर उत्पादक देश आहे. साखरेचा हंगाम ऑक्टोबरपासून वेगात चालतो. लोकसभा निवडणुकीच्या काळात साखरेचे भाव वाढू नयेत, म्हणून केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी घातली आहे. 'इंडियन शुगर मिल्स असोसिएशन' (इस्मा) ने २०२३-२४ या हंगामासाठी निव्वळ साखर उत्पादन अंदाज सुधारून तीन कोटी वीस लाख टन केला आहे. 'इस्मा'च्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील आघाडीचे साखर उत्पादक राज्य महाराष्ट्रात चालू हंगामाच्या १५ एप्रिलपर्यंत साखरेचे उत्पादन एक कोटी नऊ लाख टनांपेक्षा जास्त होते. गेल्या वर्षी याच काळात ते एक कोटी पाच लाख टन झाले होते.

उत्तर प्रदेश हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे साखर उत्पादक राज्य आहे. या राज्यातही साखर उत्पादन ९० लाख ६७ हजार टनांवरून एक कोटी एक हजार टन इतके वाढले आहे. तथापि, देशातील कर्नाटक या तिसऱ्या मोठ्या साखर उत्पादक राज्यात पंधरा एप्रिलपर्यंत पन्नास लाख सहा हजार टन इतके साखर उत्पादन झाले. गेल्या वर्षी ते ५० लाख ४९ हजार टन होते. या कालावधीत गुजरात आणि तामिळनाडू या दोन्ही ठिकाणी साखरेचे उत्पादन अनुक्रमे नऊ लाख १९ हजार टन आणि आठ लाख साठ हजार टनांवर आले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात साखर कारखाने बंद होण्याचा वेग अधिक असल्याचे 'इस्मा'ने म्हटले आहे. चालू हंगामात सुमारे १२८ कारखान्यांनी १५ एप्रिलपर्यंत कामकाज बंद केले तर गेल्या वर्षी याच काळात ५५ कारखाने बंद झाले होते. देशभरात एकूण ४४८ कारखान्यांनी गाळप पूर्ण केले आहे, तर गेल्या वर्षी एप्रिलच्या मध्यापर्यंत ४०१ कारखाने बंद होते.

इलॉन मस्कच्या कारला 'टाटा'ची चिप

अब्जाधीश इलॉन मस्क हे टेस्ला या कारच्या निर्मितीसाठी भारतात लवकरच मोठा प्लांट उभा करणार असल्याचे म्हटले जात आहे. त्यासाठी तयारीदेखील सुरू झाली आहे. 'टेस्ला'कडून भारतात प्लांट उभारणीसाठी योग्य जागेचा शोध घेतला जात आहे. ही कंपनी भारतात आल्यावर हजारो नवे रोजगार निर्माण होणार आहेत. असे असतानाच आता 'टेस्ला'ने टाटा उद्योग समूहाशी मोठा आणि महत्त्वाचा करार केला आहे.

या करारामुळेदेखील देशात मोठी रोजगारनिर्मिती होणार आहे. मस्क हे या महिन्यात भारताच्या दौऱ्यावर येणार होते. मात्र त्यांनी हा दौरा अचानक रद्द केला आहे. ते या वर्षाखेरीस भारताच्या दौऱ्यावर येऊ शकतात, असे संकेत त्यांनी दिले आहेत.

त्याआधी 'टेस्ला'ने कारनिर्मितीसाठी लागणाऱ्या सेमीकंडक्टर्सच्या निर्मितीसाठी टाटा उद्योगसमूहाच्या टाटा इलेक्ट्रॉनिक या कंपनीशी करार केला आहे. या करारामुळे टाटा इलेक्ट्रॉनिक्स या कंपनीलाही मोठा फायदा होणार आहे. आगामी काही महिन्यांमध्ये हा करार पूर्णत्वास जाणार आहे.

टेस्ला आणि टाटा इलेक्ट्रॉनिक यांच्यात झालेला हा करार किती रुपयांचा आहे, याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. टेस्ला भारतात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. 'इंडियन इलेक्ट्रॉनिक्स अँड सेमीकंडक्टर असोसिएशन'चे अध्यक्ष अशोक चंडक यांनी या करारावर प्रतिक्रिया दिली आहे. या करारामुळे इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात काम करणाऱ्या स्थानिक कंपन्यांना फायदा होईल, असे सांगितले आहे.

टाटा इलेक्ट्रॉनिक्स या कंपनीने नुकतेच या क्षेत्रातील ५०-६० तज्ज्ञ लोकांना नोकरीवर घेतले आहे. टेस्ला ही कंपनी भारतात दोन ते तीन अब्ज डॉलरची गुंतवणूक करू शकते, असे सांगितले जात आहे. या गुंतवणुकीमुळे भारताच्या अर्थव्यवस्था वाढीला फायदा होणार आहे, तसेच रोजगारनिर्मितीही होणार आहे.

दरम्यान, सर्वच क्षेत्रांमध्ये स्वावलंबी होता यावे, यासाठी भारत सरकारकडून वेगवेगळे प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी नियमांमध्ये काही बदल केले जात आहेत. वाहननिर्मिती क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी भारत सरकारने नुकतेच ३५ हजार डॉलर किंवा त्यापेक्षा अधिक किमतीची ईव्ही वाहने आयात करण्यासाठी १५ टक्के आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला.

पीपीएफमधील गुंतवणूक करबचतीसाठी फायदेशीर

२०२३-२४ हे आर्थिक वर्ष संपले असून २०२४-२५ हे नवीन आर्थिक वर्ष सुरू झाले आहे. अनेक लोक कर वाचवण्यासाठी शेवटच्या क्षणी गुंतवणुकीसाठी धाव घेत असतात. इक्विटी लिंक्ड सेव्हिंग्ज स्कीम (ईएलएसएस) आणि सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी म्हणजेच पीपीएफ हे करबचतीसाठी चांगले पर्याय आहेत.

प्राप्तिकर कायद्याच्या कलम ८० सी अंतर्गत गुंतवणुकीवर १.५ लाख रुपयांपर्यंतची वजावट आहे. वजावटीची रक्कम एकूण उत्पन्नातून वजा केली जाते. यामुळे करदायित्वही कमी होते. इक्विटी लिंक्ड सेव्हिंग्ज स्कीम्स इक्विटी म्युच्युअल फंड आहेत, जे त्यांच्या मालमत्तेपैकी किमान ८० टक्के इक्विटी आणि इक्विटी-संबंधित साधनांमध्ये गुंतवतात, तर सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (पीपीएफ) ही दीर्घकालीन सरकारी लहान बचत योजना आहे. पीपीएफ हा सर्वात सुरक्षित कर बचत गुंतवणूक पर्याय मानला जातो. याउलट, ईएलएसएस फंडांमध्ये जोखीम असते. कारण हे फंड प्रामुख्याने शेअर बाजारात पैसे गुंतवतात. शेअर बाजारात चढ-उतार होण्याची दाट शक्यता असल्याने यात जोखीम असते.

पीपीएफमधील व्याजदर संपूर्ण कार्यकाळासाठी निश्चित केलेला नाही; परंतु त्यात हमी आहे. सध्या ७.१ टक्के व्याज मिळत आहे. ईएलएसएस फंडाचा परतावा चांगला आहे. इक्विटी ओरिएंटेड योजना असल्याने ईएलएसएसमध्ये पीपीएफ किंवा मुदत ठेवीसारख्या निश्चित उत्पन्न योजनांपेक्षा दीर्घ कालावधीत जास्त परतावा देण्याची क्षमता आहे. एएमएफआय या म्युच्युअल फंड कंपन्यांच्या संघटनेच्या मते निवडक ईएलएसएस फंडांनी गेल्या पाच वर्षांमध्ये बेंचमार्क निर्देशांकापेक्षा जास्त परतावा दिला आहे. यामध्ये क्वांट ईएलएसएस टॅक्ससेव्हर फंड, एसबीआय लाँग टर्म इक्विटी फंड आणि डीएसपी ईएलएसएस टॅक्स सेव्हर फंड यांचा समावेश आहे, ज्यांचे रिटर्न्स २० ते ३० टक्के आहेत.

ईएलएसएस आणि पीपीएफमधील गुंतवणुकीवर कलम ८० सी अंतर्गत वजावट उपलब्ध आहे. एका आर्थिक वर्षात कलम ८० सी अंतर्गत कमाल वजावट मर्यादा १.५ लाख रुपये आहे. रिटर्नवरील कराच्या बाबतीत पीपीएफ म्हणजेच सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी ईएलएसएसला मागे टाकते. यामध्ये गुंतवणूक, व्याज आणि मॅच्युरिटीवर परतावा हे तिन्ही घटक करमुक्त आहेत. ईएलएसएसच्या बाबतीत गुंतवणुकीच्या नफ्यावर दीर्घकालीन भांडवली नफा म्हणजेच एलटीसीजी कर भरावा लागतो.

इंडिगो बनली जगातील तिसरी मोठी विमान वाहतूक कंपनी

भारताची इंडिगो एअरलाइन मार्केट कॅपच्या बाबतीत जगातील तिसरी सर्वात मोठी विमान वाहतूक कंपनी बनली आहे. कंपनीचे मार्केट कॅप १७.६ बिलियन डॉलर (सुमारे १.४७ लाख कोटी) पर्यंत पोहोचले आहे. 'साऊथवेस्ट एअरलाइन्स'ला मागे टाकत 'इंडिगो'ने हे स्थान मिळवले आहे.

जागतिक विमान कंपन्यांच्या या यादीत अमेरिकास्थित डेल्टा एअरलाइन्स पहिल्या क्रमांकावर आहे. तिचे मार्केट कॅप ३०.४ अब्ज डॉलर (सुमारे २.५३ लाख कोटी रुपये) आहे. रेयनियर होल्डिंग्ज २६.५ अब्ज डॉलर (२.१६ लाख कोटी रुपये) मार्केट कॅपसह दुसऱ्या स्थानावर आहे. गेल्या वर्षी मार्चमध्ये, इंडिगो मार्केट कॅपच्या बाबतीत जागतिक एअरलाइन्सच्या यादीत चौदाव्या क्रमांकावर होती. 'इंडिगो'ने डिसेंबर २०२३ मध्ये 'युनायटेड एअरलाइन्स'ला तर या वर्षी जानेवारीमध्ये 'एअर चायना'ला आणि फेब्रुवारीमध्ये 'सिंगापूर एअरलाइन्स'ला मागे टाकले. कंपनीच्या शेअर्समध्ये सहा महिन्यांमध्ये पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे.

गेल्या एका वर्षात कंपनीच्या समभागांनी १०२.५५ टक्के परतावा दिला आहे. गेल्या सहा महिन्यांमध्ये ५०.२५ टक्के, एका महिन्यात १८.२५ टक्के आणि या वर्षी एक जानेवारीपासून २७.७८ टक्के वाढ झाली आहे. आज म्हणजेच १० मार्च रोजी तो ४.७३ टक्के वाढीसह ८,३०६ रुपयांवर बंद झाला. 'इंडिगो' म्हणजेच 'इंटरग्लोब एव्हिएशन'चे शेअर्स १० एप्रिल रोजी ४.७३ टक्के वाढले आणि ३,८०६ रुपयांवर बंद झाले. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात 'इंडिगो'चा वाटा ६०.२ टक्के आहे. प्रवाशांच्या संख्येच्या बाबतीत 'एअर इंडिया' दुसऱ्या स्थानावर आहे. तिचा वाटा १२.२ टक्के आहे. तथापि, टाटा समूहांतर्गत चालणाऱ्या विमान कंपन्यांचा एकूण वाटा २८.२ टक्के आहे.

ज्येष्ठ नागरिकांमुळे सरकार श्रीमंत!

दिवसेंदिवस गुंतवणुकीचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढत आहे. भविष्यातील गुंतवणुकीचा सामना करण्यासाठी लहान वयापासूनच गुंतवणूक करणे फायद्याचे ठरते. दरम्यान, देशातील ज्येष्ठ नागरिकांना समोर ठेवून बँकांनी अनेक योजना सुरू केल्या आहेत. सर्व मुदत ठेव योजनांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना इतरांपेक्षा ०.५० टक्के अधिक व्याजदर मिळत आहे. त्यामुळे मुदत ठेवीमध्ये केलेली गुंतवणूक ज्येष्ठ नागरिकांना फायद्याची ठरते.

दरम्यान, ज्येष्ठ नागरिकांनी ठेवलेल्या मुदत ठेवींच्या माध्यमातून सरकारलादेखील मोठा फायदा मिळत आहे. गेल्या वर्षभरात सरकारने मुदत ठेवींवर मिळणाऱ्या व्याजावर ज्येष्ठ नागरिकांकडून २७ हजार कोटी रुपयांहून अधिक कमाई केली आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या मुदत ठेवींवर बँका चांगला परतावा देत आहेत. सरकारने विविध सामाजिक योजना सुरू केल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांना त्याचा मोठा फायदा होतो. सरकारलाही ज्येष्ठ नागरिकांनी ठेवलेल्या मुदत ठेवीवरील व्याजाचा मोठा फायदा होत आहे. वर्षभरात या ठेवीतील व्याजातून सरकारची २७ हजार कोटी रुपयांची कमाई झाल्याची माहिती स्टेट बँकेने दिली आहे. म्हणजेच एका अर्थाने ज्येष्ठ नागरिकांनी देशाला श्रीमंत केले आहे.

ज्येष्ठ नागरिक मुदत ठेवींवर मिळवत असलेल्या व्याजावर कर लादून सरकारनेही कमाई केली आहे. ज्येष्ठ नागरिकांनी मुदत ठेवीमध्ये केलेली गुंतवणूक फायद्याची ठरते, ती अशी. सर्व बँकांनी मुदत ठेवीवरील व्याजदरात वाढ केली आहे. सामान्य ग्राहकांपेक्षा ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा मोठा फायदा मिळतो. दुसरीकडे सरकारला या योजना अधिकचा फायदा मिळवून देत असल्याची माहिती स्टेट बँकेने दिली आहे. देशभरात मुदत ठेव खात्यांची संख्या ७.४ कोटी आहे. सरकारने ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या व्याजावर कर लावून वर्षभरात तब्बल २७ हजार कोटी रुपयांची कमाई केली आहे. दरम्यान, मुदत ठेवीच्या रकमेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक मुदत ठेवीत रक्कम गुंतवत असल्याचे चित्र दिसत आहे. वर्षभरात मुदत ठेवींच्या रकमेत १४३ टक्क्यांची वाढ झाली आहे. मुदत ठेवीवर चांगला व्याजदर मिळत असल्याने लोकांमध्ये ही योजना जास्त लोकप्रिय ठरत आहे. सध्या देशभरात मुदत ठेव खात्यांची संख्या ७.४ कोटी झाली आहे. यामध्ये १५ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम खात्यात जमा आहे.

महायुतीचे जागावाटप निश्चित?

नाशिक, ठाणे सेनेकडे, द. मुंबई, पालघर भाजपला मिळणार?

विशेष प्रतिनिधी/मुंबई

महायुतीच्या काही जागांवरील तिढा अजूनही कायम होता. परंतु आता चौथ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया जवळपास संपत आलेली आहे. त्यामुळे राहिलेल्या जागांचा तिढा सोडविण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री कोल्हापूर दौऱ्यावर असताना तेथून ते सूत्रे हलवित आहेत. सकाळपासूनच फोनवरून संवाद सुरू असल्याने जवळपास महायुतीतील जागावाटपाचा तिढा संपल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यानुसार ठाणे आणि नाशिक शिंदे गटाला मिळणार असून, दक्षिण मुंबई आणि पालघर भाजपला मिळू शकतात, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे याची घोषणा लवकरच होऊ शकते.

राज्यात लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे संपलेले आहेत. आता तिसरा टप्पा ७ मे रोजी संपणार आहे. त्यामुळे सध्या तिसऱ्या टप्प्यासाठी राज्यात प्रचारांचा धडाका सुरू आहे. महायुतीचे नेते आणि महाविकास आघाडीचे नेतेही ठिकठिकाणी सभा घेत असून, आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. महाविकास आघाडीने पाडव्याच्या मुहूर्तावरच जागावाटपाचा तिढा सोडवून टाकला. परंतु महायुतीत अजूनही जागावाटपाचा घोळ सुरूच असल्याचे चित्र आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही कोल्हापुरातच आहेत. कारण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी कौल्हापूर दौऱ्यावर होते. मुख्यमंत्री सकाळीच कोल्हापुरात आले. स्थानिक नियोजन करतानाच त्यांनी सातत्याने फोनवर संवाद साधून जागावाटपाचा तिढाही सोडविल्याचे सांगण्यात येत आहे. दक्षिण मुंबई, पालघर, ठाणे आणि नाशिक या चार जागांचाच तिढा होता. परंतु या चारही जागांचा प्रश्न मार्गी लागल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. ठाणे हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असल्याने तो मतदारसंघ सोडणार नाहीत. यासोबतच नाशिकमध्येही स्टँडिंग खासदार शिंदे गटाचे आहेत. त्यामुळे त्या जागेवरही दावा आहे. त्यामुळे या दोन्ही जागा शिंदे गटाकडेच राहण्याचे जवळपास निश्चित झाले आहे. दक्षिण मुंबईवर पहिल्यापासूनच भाजपचा दावा आहे. त्यामुळे ही जागा भाजपला सुटण्याची शक्यता आहे. येथे कोणाला उमेदवारी देणार, याबाबत उलटसुलट चर्चा असली तरी राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा हे मैदानात उतरतील, असे सांगितले जात आहे. यासोबतच पालघरही भाजपला मिळण्याची शक्यता आहे. तेथे राजेंद्र गावित हे खासदार आहेत. त्यामुळे त्यांना यावेळी भाजपमधून उमेदवारी मिळू शकते. दुसरीकडे ठाणे शिंदे गटाला मिळणार असल्याने तेथे उमेदवारी कोणाला मिळणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

प्रताप सरनाईक मैदानात?

ठाणे हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानला जातो. परंतु येथे ठाकरे गटाचे राजन विचारे यांच्यासमोर लढण्यासाठी त्यांच्याकडे सक्षम उमेदवार नाही. त्यामुळे शिंदे यांची अडचण झाली आहे. परंतु ठाणे ही जागा सोडायची नाही, हे मुख्यमंत्र्यांनी ठरविल्याने आता आमदार प्रताप सरनाईक यांना उमेदवारी दिली जाऊ शकते, असे बोलले जात आहे. एवढेच नव्हे, तर त्यांनाच आता तयारीला लागण्याच्या सूचना दिल्याची माहिती आहे. त्यामुळे लवकरच ते उमेदवारी अर्ज दाखल करू शकतात.

कांदिवलीतील विन रुग्णालयात आग

आगीत चौघे १५ ते ३० टक्के भाजले

मुंबई : कांदिवली पश्चिमेला न्यू लिंक रोडवर तळ अधिक ३० मजली अशीस कैसर सोसायटीतील मागील बाजूस असलेल्या विन रुग्णालयात शनिवारी दुपारी २.४५ वाजता आग लागली. काही वेळातच आग पसरली आणि इमारतीत धुराचे लोण पसरले. इमारतीत धुराचे लोण पसरल्याने काही जण अडकले. यात चार जण १५ ते ३० टक्के भाजले असून, त्यांना उपचारासाठी बोरिवलीतील न्यू विन रुग्णालयात दाखल केले असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, रुग्णालयात एसी बसवण्याचे काम सुरू होते आणि त्याचवेळी आग लागली. याबाबत अग्निशमन दलाचे अधिकारी पुढील तपास करत असून, रिपोर्ट आल्यानंतर नेमकं कारण समजू शकेल, असे आर मध्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त सध्या नांदेडकर यांनी सांगितले.

कांदिवली पश्चिम येथील न्यू लिंक रोड वर तळ अधिक ३० मजली अशीस कैसर सोसायटी आहे. या सोसायटीच्या मागील बाजूस विन रुग्णालय असून, शनिवारी दुपारी २.४५ वाजता रुग्णालयात आग लागली. रुग्णालयात आग लागल्याने इमारतीतील रहिवाशांची धावपळ उडाली. अग्निशमन दलाला माहिती मिळताच तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन बचावकार्य हाती घेतले. आग इमारतीत पसरू नये यासाठी अग्निशमन दलाने खबरदारी घेतली. चारही बाजूला पाण्याचा मारा व इतर यंत्रणांचा वापर करून पाऊण तासात आगीवर नियंत्रण मिळवण्यात दलाला यश आले. आगीत भाजून चार जण जखमी झाले. जखमींवर बोरिवलीतील न्यू विन्स रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालयातून सांगण्यात आले.

जखमींची नावे

१) स्वाधीन मुखी (५६) - ३५ ते ४० टक्के भाजले
२) राजदेव (३५)- १५ टक्के भाजले
३) नरेंद्र मुर्या (४५) - किरकोळ भाजले
४) सुनील (३५) - किरकोळ भाजले

एसीचे काम सुरू असताना आग लागल्याचा अंदाज

न्यू लिंक रोडवर ३० मजली आशिष कैसर सोसायटी असून सोसायटीच्या मागील बाजूस रोडच्या जवळ तळमजल्यावर विन रुग्णालय आहे. रुग्णालयात एसीचे काम सुरू असताना आग लागल्याचा अंदाज आहे. आग लागली त्यावेळी एसीचे काम करणारे आणि रुग्णालयाचे दोन कर्मचारी असे चार जण जखमी झाले आहेत. त्यांना विन रुग्णालयाच्याच बोरिवलीतील दुसऱ्या रुग्णालयात दाखल केले आहे. रुग्णालयाची फायर फायटिंग सिस्टम कार्यान्वित असल्याने आगीवर वेळीच नियंत्रण मिळवणे शक्य झाल्याचे अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले.

दक्षिण मुंबईत महायुतीचा विजय निश्चित - मंगलप्रभात लोढा

मुंबई : प्रसार माध्यमाला दिलेल्या मुलाखतीदरम्यान कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी हे स्पष्ट केले आहे की, दक्षिण मुंबईमधील उमेदवाराबाबत वरिष्ठ योग्य तो निर्णय घेतील आणि येत्या काही दिवसांत तो निर्णय येण्याची शक्यता आहे. महायुतीमधील सर्व पक्षांची भक्कम एकजूट असून, आम्ही या मतदारसंघात १००% जिंकणार आहोत, असा विश्वास मंत्री लोढा यांनी व्यक्त केला.

दक्षिण मुंबईत कोणत्या उमेदवाराला संधी दिली जाईल याबाबत बोलताना मंत्री लोढा म्हणाले, "आमचा उमेदवार ठरलेला आहे, आणि त्यांचं नाव आहे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी. ते आमचे एकमेव उमेदवार असून, त्यांच्या नेतृत्वात आम्ही सर्वजण त्यांचे प्रतीक म्हणून उभे राहणार आहोत. गेल्या १० वर्षांच्या काळात त्यांनी देशाला उन्नतीच्या मार्गावर नेलं. त्यामुळे जनता त्यांना भरघोस मतांनी निवडून देईल. त्यांच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास आहे. त्यामुळे सर्वच त्यांच्यासोबत उभे राहतील. २०१४ मध्ये, २०१९ मध्ये ज्यांनी मोदीजींचा फोटो दाखवून मते मागितली, निवडून आले त्यांनी कशाप्रकारे विश्वासघात केला हे सर्वांनाच माहिती आहे. मविआ सरकारच्या काळात याच दक्षिण मुंबईमध्ये याकूबच्या कबरीची मजार करण्याचा प्रयत्न झाला. काही दिवसांपूर्वीच भोईवाडा पोस्ट गल्ली परिसरात झालेला प्रकार सर्वांना माहिती आहे. बंगालमध्ये संदेशखळी करणाऱ्या शेख शाहजहानसारखेच लोकं आता इथे सुद्धा तयार होत आहेत काय?, असा प्रश्न पडतो."

अखेर ५० मीटर क्षमतेचे पंप बसवणार

मुंबई : मुंबईचा विकास झपाट्याने होत असून अटल सेतू प्रवासी सेवेत दाखल झाल्याने रायगड ते मुंबई थेट जोडली गेली आहे. शिवडीचा ही विकास झपाट्याने होत असून अटल सेतू मुळे भविष्यात शिवडीला चांगलेच डिमांड येणार आहे. त्यामुळे ३० मीटर क्षमतेच्या पंपऐवजी ५० मीटर क्षमतेचे पंप बसवण्याचा निर्णय पालिकेच्या एफ साऊथ वॉर्डने घेतला आहे. त्यामुळे आधीची ३० मीटर क्षमतेच्या पंपाची निविदा प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली आहे.

शिवडी येथील गोलंजी हिल जलाशयात ३० मीटरचे पाण्याचे दोन पंप बसवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या जलाशयातर्फे एफ दक्षिण विभागातील प्रभाग क्रमांक २०१, २०२, २०३, २०४, २०५,२०६ मधील नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. यातील नायगाव विभागातील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे काम म्हाडाच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. या विभागात भविष्यात मोठ्या प्रमाणात पुनर्विकास होणार आहे. येथे राहणाऱ्या हजारो रहिवाशांना पुनर्विकास झाल्यावर ५०० फुटाची सदनिका मिळणार आहे. त्यामुळे भविष्यात या विभागातील नागरिकांकडून पिण्याच्या पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जाणार आहे.

३० मीटरच्या पंपाच्या निविदा प्रक्रियेला स्थगिती

५० मीटरपेक्षा जास्त क्षमतेचे पंप बसवावेत सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया रद्द करून नवीन निविदा काढल्यास पालिकेच्या पैशाचा अपव्यय होणार नाही, तसेच विभागातील नागरिकांना पाणीपुरवठा देखील सुरळीत होईल, अशी मागणी शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) माजी नगरसेवक सचिन पडवळ यांनी पालिकेकडे केली होती. अखेर पडवळ यांच्या मागणीची दखल घेत ३० मीटर क्षमतेचे पंप बसवण्याच्या निविदा प्रक्रियेला स्थगिती देण्यात आल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

'मलेरियामुक्त मुंबई' महापालिकेचे उद्दिष्ट

मुंबई : पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांत मलेरिया हा अधिक धोकादायक आहे. मलेरियाची लागण झाल्याचे निदान होताच वेळीच उपचार न केल्यास जीवावर बेतू शकते. मलेरियावर नियंत्रण मिळवण्यासह मलेरियामुक्त मुंबई हे मुंबई महापालिकेचे उद्दिष्ट आहे. यासाठी प्रत्येकाचा सहभाग गरजेचा आहे. हिवताप निर्मूलनासाठी 'हिवताप विरुद्ध जगाच्या संरक्षणासाठी, लढा करूया गतिमान', असे घोषवाक्य वर्ष २०२४ साठी जाहीर करण्यात आले.

पालिकेच्या या मोहिमेत रहिवाशांनी सहकार्य करावे, सहभाग घ्यावा, असे आवाहन पालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पालिका आयुक्त प्रशासक भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक प्रयत्न सुरू असल्याची माहिती गुरुवारी अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी दिली.

मलेरिया, डेंग्यू, लेप्टो आदी आजार पावसाळ्यात उद्भवतात. आजार कुठलाही असो, वेळीच उपचार करणे गरजेचे आहे. मलेरियामुक्त मुंबई यासाठी मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. जागतिक हिवताप दिनाच्या पार्श्वभूमीवर याबाबत पालिकेच्या मुंबई सेंट्रल येथील नायर दंत रुग्णालय आणि महाविद्यालय येथे हिवताप प्रतिबंधक उपाययोजना, उपचार, मार्गदर्शन, मलेरिया निर्मूलन या विषयावर परिसंवादाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यावेळी डॉ. शिंदे बोलत होते.

यावेळी वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये संचालक तथा अधिष्ठाता (नायर दंत महाविद्यालय) डॉ. नीलम अन्द्राडे, कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शाह, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. जयंती शास्त्री, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मलेरिया रिसर्च संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. श्रीनिवास बी. एम. सेठ, केईएम रूग्णालयाच्या प्राध्यापिका डॉ. कविता जोशी, कीटक नियंत्रण अधिकारी चेतन चौबळ, मुंबई शहर (इंडियन मेडिकल असोसिएशन) अध्यक्ष डॉ. लाड आदी उपस्थित होते.

आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध

हिवताप नियंत्रण करण्यासाठी डासांची उत्पत्ती स्थाने प्रतिबंध करणे, सर्व महानगरपालिकेचे दवाखाने, रुग्णालये येथे तापाच्या रुग्णाकरिता आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले.

अर्धवट उपचार सोडू नयेत, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा!

हिवतापाच्या रुग्णांनी वेळीच उपचार तसेच वैद्यकीय सल्ला घ्यावा. खासगी डॉक्टरांनी हिवतापाचा रुग्ण आढळल्यास संबंधित विभागीय आरोग्य अधिकारी यांना संपूर्ण माहितीसह त्वरित कळविणे गरजेचे आहे. हिवताप (मलेरिया) तपासणीस व आरोग्य कर्मचारी यांनी वस्तीपातळीवर सातत्याने गृहभेटी देऊन सर्वेक्षण करावे, रुग्णांनी हिवतापाचे उपचार अर्धवट सोडू नयेत, संपूर्ण उपचार घ्यावेत, घरात व घराच्या आसपास पाणी साचू न देणे, डासांची उत्पत्ती स्थाने नष्ट करणे यावर नागरिकांनी भर द्यावा, लक्षणे आढळल्यास नागरिकांनी त्वरित उपचार व वैद्यकीय सल्ला घ्यावा, असेही डॉ. दक्षा शहा म्हणाल्या.

घातक शस्त्रांसह तडीपार गुन्हेगारासह तिघांना अटक

मुंबई : घातक शस्त्रांसह एका तडीपार गुन्हेगारासह तिघांना काळाचौकी, जुहू आणि मानखुर्द पोलिसांनी अटक केली. या तिघांकडून दोन गावठी कट्टे, एक देशी पिस्तूल आणि चार काडतुसे पोलिसांनी जप्त केले आहे. इक्बाल वलीमोहम्मद शेख, लोकेश राजेश पुजारी आणि ऍलन फ्रॉन्सिस रॉड्रिक्स अशी या तिघांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध घातक शस्त्रे बाळगल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून, अटकेनंतर त्यांना स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले होते.

घातक शस्त्रांच्या विक्रीसाठी काहीजण विलेपार्ले, रे रोड आणि मानखुर्द रेल्वे स्थानकात येणार असल्याची माहिती स्थानिक पोलिसांना मिळाली होती. या माहितीनंतर जुहू पोलिसांनी विलेपार्ले येथील विद्यार्थिनी शाळेसमोरील तिलक उद्यानाजवळ साध्या वेशात पाळत ठेवून ऍलन रॉड्रिक्सला ताब्यात घेतले होते. त्याच्या अंगझडतीत पोलिसांना एक देशी बनावटीचे पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे आणि एक मॅगझीन सापडली. ऍलन हा अंधेरीतील गावदेवी डोंगर, अल मदिना मशिद चाळीत राहतो. तो तिथे पिस्तूलची विक्रीसाठी आला होता; मात्र त्यापूर्वीच त्याला पोलिसांनी अटक केली. दुसऱ्या कारवाईत काळाचौकी पोलिसांनी इक्बाल शेख याला अटक केली. त्याच्याकडून पोलिसांनी एक गावठी कट्टा आणि जिवंत काडतुस जप्त केले आहे. इक्बाल हा रे रोड रेल्वे स्थानकाजवळील कॉटनग्रीन सिमेंट गोदामाजवळ घातक शस्त्रांसह आला होता. तिसऱ्या कारवाईत लोकेश पुजारी या तडीपार गुन्हेगाराला मानखुर्द पोलिसांनी अटक केली. लोकेश हा मानखुर्दच्या लल्लूपार्क कंपाऊंडमध्ये राहत असून, त्याच्याविरुद्ध पोलिसांनी तडीपारची कारवाई केली होती. ही कारवाई सुरू असताना तो मानखुर्द रेल्वे स्थानकात शस्त्रांची विक्रीसाठी आला होता. यावेळी त्याला मानखुर्द पोलिसांनी अटक केली. त्याच्या अंगझडतीत पोलिसांना एक गावठी कट्टा आणि जिवंत काडतुस, मोबाईल सापडले.

एक पिस्तूल, दोन गावठी कट्टे आणि चार काडतुसे जप्त

हत्येच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस अटक

मुंबई : हत्येच्या गुन्ह्यात दीड वर्षांपासून फरार असलेल्या सुफियान युसूफ शेख असे या २७ वर्षीय आरोपीस गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. अटकेनंतर त्याचा ताबा नालासोपारा पोलिसांकडे सोपविण्यात आला आहे. गेल्या वर्षी जानेवारी महिन्यांत नालासोपारा येथे एका मशिदीच्या टस्टच्या वादातून दोन गटात हाणामारी झाली होती. त्यात एका गटाने दुसऱ्या गटातील तक्रारदारासह मुस्सवीर मोहम्मद अनीस डायस ऊर्फ मच्चूभाई यांच्यावर लाथाबुक्क्यांसह चाकूने प्राणघातक हल्ला झाला होता. या हल्ल्यात गंभीररीत्या जखमी झालेल्या मुस्सवीर याचा नंतर रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी हत्येसह भादंविच्या विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. याच गुन्ह्यांत नंतर काही आरोपींना पोलिसांनी अटक केली होती. या आरोपींच्या चौकशीतून हत्येच्या या गुन्ह्यात सुफियानचा सहभाग उघडकीस आला होता. या घटनेनंतर तो पळून गेल्याने त्याच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली होती. ही शोधमोहीम सुरू असतानाच सुफियान हा जोगेश्वरी परिसरात राहत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती.

ऑनलाईन फसवणुकीत एक कोटी वाचविण्यात यश

मुंबई : ऑनलाईन फसवणुकीची एक कोटी दोन लाख रुपयांची रक्कम वाचविण्यात मुंबई पोलिसांच्या सायबर सेल पोलिसांना यश आले आहे. लवकरच ही रक्कम संबंधित तक्रारदाराच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

गेल्या काही दिवसांत शेअर ट्रेडिंग आणि फेडेक्स कुरिअरच्या नावाने फसवणुकीचे प्रकार घडत होते. अशाच प्रकारे वांद्रे आणि कांदिवली परिसरात राहणाऱ्या दोन तक्रारदारांची अज्ञात सायबर ठगांनी शेअर ट्रेडिंग आणि फेडेक्स कुरिअरच्या माध्यमातून ऑनलाईन फसवणूक केली होती. या दोघांकडून कोट्यवधी रुपयांचा अपहार करून या ठगांनी त्यांची फसवणूक केली होती. हा प्रकार लक्षात येताच त्यांनी सायबर सेलमध्ये ऑनलाईन तक्रार केली होती. या तक्रारीनंतर त्यांची सायबर सेल पोलिसांकडून जबानी नोंदविण्यात आली होती. या जबानीनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय चव्हाण यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक मंगेश भोर, बाविस्कर, सिंग, शिखरे, दळवी, शिंदे, भावसार यांनी तपास सुरू केला होता.

संबंधित बँक खात्याची माहिती काढून संबंधित नोडल अधिकाऱ्यांना या खात्यातील व्यवहार थांबविण्याची विनंती केली होती. या विनंतीनंतर या अधिकाऱ्यांनी या बँक खात्यातील १ कोटी २ लाख रुपये फ्रिझ केले होते. ही रक्कम लवकरच तक्रारदारांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहे. त्यामुळे त्यांनी सायबर सेल पोलिसांचे आभार व्यक्त केले आहेत.

मुंबई पोलिसांच्या सायबर सेलची कामगिरी

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य; योजनेत ५ हजार घरे उपलब्ध

विरार बोळींजमधील घरांचा मिळणार दोन आठवड्यांत ताबा

मुंबई : म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळामार्फत विरार-बोळींज येथील गृहप्रकल्पातील सुमारे ५ हजार घरांची विक्री प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर विक्री करण्यात येत आहेत. या योजनेसाठी मंडळाने विविध सवलती घर खरेदीदारांसाठी जाहीर केल्या आहेत. घर खरेदीदाराने घराची किंमत भरल्यानंतर त्यांना दोन आठवड्यांत घराचा ताबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

कोकण मंडळामार्फत विरार-बोळींज येथे मोठा गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात आला आहे. या प्रकल्पातील घरे मंडळामार्फत सोडतीमध्ये घेण्यात आली होती; मात्र सोडतीमध्ये या घरांना प्रतिसाद येत नसल्याने म्हाडाच्या धोरणानुसार या घरांची विक्री प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर करण्याचा निर्णय मंडळाने घेतला. त्यानुसार या घरांची विक्री ऑनलाईन पद्धतीने सुरू आहे. या घरांच्या विक्रीबाबत म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये 'विरार-बोळींज' गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिका विक्री बाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये अर्जदारांनी सदनिकेची विक्री किंमत भरल्यानंतर दोन आठवड्यातच घर खरेदीदाराला घराचा ताबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी घर खरेदीदाराने घराची रक्कम भरल्यानंतर घराचा ताबा मिळण्यास सुमारे तीन महिने कालावधी लागत होता.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेंतर्गत विरार-बोळींज प्रकल्पातील सदनिका घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांकरिता मंडळाने उत्पन्नाची अट शिथिल केली आहे. अर्जदाराने उत्पन्नाचा कोणताही पुरावा सादर करणे गरजेचे नाही. अर्ज करण्यासाठी अर्जदाराचे आधार कार्ड व पॅन कार्ड आवश्यक असून, अर्जदार विवाहित असल्यास पती व पत्नी दोघांचे आधार कार्ड, पॅन कार्ड बंधनकारक आहे. एक अर्जदार या प्रकल्पात एकापेक्षा अधिक सदनिकांकरिता अर्ज करू शकणार आहेत. या प्रकल्पातील सर्व इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त (ओसी) असून, रेडी टू मूव्ह स्वरूपातील ही मालमत्ता आहे. या योजनेअंतर्गत १ बीएचके आणि २ बीएचके स्वरूपातील अत्याधुनिक सोयी-सुविधायुक्त सदनिका उपलब्ध आहेत.

प्रकल्पाला देखील नियमित पाणीपुरवठा सुरू

सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पातून वसई-विरार महानगरपालिकेला पाणीपुरवठा सुरू झाला असल्यामुळे 'विरार-बोळींज' येथील गृहनिर्माण प्रकल्पाला देखील नियमित पाणीपुरवठा सुरू झाला आहे. त्यामुळे घरे घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी मंडळाच्या प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन मंडळाचे मुख्य अधिकारी मारोती मोरे यांनी केले आहे.